
शनिवार । ६ जून १९८१ । एक रुपया

# माणूस



## २१.....

वीस वर्षांपूर्वी एक जून या दिवशी 'माणूस' चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. उत्तम कागद. साधना प्रेसची सुबक छपाई. ग्रामीण भागाकडे लक्ष वेधणारे विषय. किंमत पन्नास पैसे. जाहिरात नाही. दोन हजार प्रती. अंक संपल्याची मुंबईच्या एजंटाची तार आली. म्हणून पुढचा अंक तीन हजार.

दुसऱ्या अंकाचा मजकूर द्यायला साधना प्रेसमध्ये गेलो असता पुण्यातले नामवंत प्रकाशक श्री. रा. ज. देशमुख तेथे भेटले. अंकाचा विषय निघाला. मुद्रक श्री. चिं. स. वझे होतेच. देशमुख म्हणाले, " सहा अंक काढलेस तर पेढे देईन. "

नंतर दोन का तीन आठवड्यांनीच पानशेत झाले. साधना प्रेस पुरात बुडाला. कागद घेऊन ठेवला होता. त्याचा सर्व लगदा झाला. साधना प्रेसच काही काळ बंद ठेवावा लागला होता. पण 'माणूस'चे अंक निघतच राहिले.

प्रथम मासिक स्वरूपात. नंतर पाक्षिक. पुढे साप्ताहिक. मध्यंतरी काही काळ आठवड्यातून माणूसचे दोन अंकही निघत होते. सहाच काय, सहाशे अंक केव्हाच होऊन गेले. देश-

मुखांनी पेढे दिले की नाही ते आठवत नाही.

परवाच देशमुख लाटकरांच्या कल्पना प्रेसमध्ये भेटले. " ' योद्धा शेतकरी ' प्रसिद्ध झालेला अंक विकत घेऊन अनेकांना वाचायला दिला. त्या अगोदरचा ' कार्व्हर ' चे चरित्र असलेला अंकही फार छान होता ", असे म्हणाले.

पहिल्या अंकात प्रसिद्ध झालेली सातारा जिल्ह्यातील ग्रामीण साक्षरतेच्या चळवळीची माहिती आणि 'योद्धा शेतकरी' व 'कार्व्हर'ची प्रसिद्धी. वीस वर्षांत माणूसचे हे ग्रामसूत्र बदलले नाही. ग्रामीण भागातून वर येणारा नवा सुशिक्षित मध्यमवर्ग व शहरातील मध्यमवर्ग यात दुवा उत्पन्न करणे, असलेली दरी कमी करणे, या दोन्ही घटकांच्या विविध उपक्रमांना, चळवळीना साथ देणे, त्यांच्यातील विधायक पुरुषार्थ जागा करणे, एका सतुलित व विकेंद्रित समाजजीवनाचा आदर्श त्याच्यासमोर ठेवणे ही ' माणूस ' सुरू करण्यामागील उद्दिष्टे होती. सुरुवातीलाच काढलेल्या पत्रकात म्हटले होते—

" शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. उद्योगधंद्याचे क्षेत्र वाढू लागले आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात महत्त्वाचे दूरगामी बदल घडून येत आहेत. एक नवा पांढरपेशा *मध्यमसमाज येथे आकारास येत* आहे.

" नव्या काळाला अनुरूप असे नवे संस्कार व नवे विचार या नवोदित समाजापर्यंत नेऊन पोहोचविणे हा ' माणूस ' चा प्रयत्न आहे.

- उपक्रमशील व्यक्तिजीवन
- सामाजिक जबाबदारीची जाणीव
- अध्यात्म व विज्ञान यांच्या समन्वयावर आधारलेली जीवनदृष्टी
- सर्वांगीण जीवनविकासाचा ध्यास...

या आहेत ' माणूस ' च्या प्रयत्नामागील मूलभूत प्रेरणा. "

' माणूस 'चा तिसरा, पानशेतपुरानंतर निघालेला अक पाहून एस्. एम्. जोशी यांनी कळवले होते—

" पुरुषार्थ-ईर्षा निर्मिणारा 'माणूस' .... चा अंक. लेखांची निवड मार्मिक व कौशल्यपूर्ण .... मुखपृष्ठावरील चित्राची योजनादेखील अकातील विचार आणि प्रेरणा याना साजेशीच .... ' माणूस ' चा विकास असाच होत जावो आणि महाराष्ट्राला त्यापासून स्फूर्ती प्राप्त होवो .... "

पत्रकातील उद्दिष्टे आणि प्रत्यक्ष अंकातील साहित्य, उक्ती व कृती यांच्यात मेळ साधण्याचा सतत वीस वर्षे असा प्रयत्न चालू आहे.

गेल्याच महिन्यात निपाणीला गेलो होतो. तेथे रस्त्यावर ठाण मांडून बसलेल्या हजारो शेतकऱ्यांनी ' माणूस ' मधून आलेल्या ' योद्धा शेतकरी ' चे वाचन करून या आदोलनात उडी घेतल्याचे जेव्हा अनेकांनी सांगितले, रस्त्यावर उभारलेल्या आदोलननगरीतील अनेक तंबूतून जेव्हा 'माणूस'चे जीर्णशीर्ण झालेले अक पाहिले, तेव्हा ही वीस वर्षांची धडपड अगदीच वाया गेलेली नाही हे जाणवून थोडे बरे वाटले.

आता थांबावे, थोडा बदल करावा, नव्या व ताज्या दमाच्या तरुण सहकाऱ्याकडे सगळ सोपवून आपण काही वेगळे अनुभव घ्यावेत असही त्या वेळी वाटून गेलं.

पाहू या ही वेळ केव्हा येते.

वीस-पंचवीस वर्षं एकाच प्रकारचं काम करून करून नाही तरी चाकोरी तयार झालेली असतेच. चाकोरी आली की तोचतोपणा, साचेबंदपणा आलाच आणि चाकोऱ्या बदलल्या नाहीत, आपणच निर्माण केलेले साचे मोडले नाहीत तर तो ' माणूस ' कसला ?

नदी वहती भली ....

—संपादक


## साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे

अंक : पहिला

६ जून १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

# सप्रेम नमस्कार..

## शब्दप्रामाण्यवादी....

◻ 'माणूस' २५ एप्रिल '८१ च्या अंकातील डॉ. शरद अभ्यंकराचा 'बुद्धिप्रामाण्यवाद–काही गैरसमजुती' या लेखाच्या संदर्भात प्रथम मला एक गोष्ट स्पष्ट करावी वाटते ती अशी की, बुद्धिप्रामाण्यवादी लोकाच्या संदर्भात ह्या गैरसमजुती नाहीत, तर ज्याना बुद्धिप्रामाण्यवाद नको आहे त्यांनी लोकांना आवडतील व लोक बुद्धिप्रामाण्यवादाला विरोध करतील यासाठी निर्माण केलेले हे युक्तिवाद आहेत.

डॉक्टरांना नास्तिक असण्याची बरीच भीती दिसते, वास्तविक बुद्धिप्रामाण्यवाद्याना कुणी नास्तिक म्हटलं तर हायसं वाटायला हवं. कारण कितीही प्रयत्न करून ईश्वर दिसत नाही, त्याची जाणीव होत नाही, कुणी झाली म्हटलं तर तपासता येत नाही. स्वाभाविकच 'तो' नाही. रूढ अर्थाने यालाच लोक नास्तिक म्हणतात. यात गैरसमजुतीचा भाग कोणता हे मला समजले नाही. डॉ. ना बुद्धिप्रामाण्यवादी म्हणवून घ्यायचंच व त्याचबरोबर नास्तिकही कुणी म्हणू नये असे वाटते. त्याचमुळे त्याना ही गैरसमजूत वाटली. या संदर्भात एक उदाहरण असे की, एक जडवादी व्यासपीठावर देवाला शिव्या देत असे व घरी आला की शनिवार सोडायचा, असं का? तर त्याचं उत्तर ठरलेलं, ईश्वर नसलाच तर शिव्या आहेतच, पण असलाच तर काय घ्या? तशीच काहीशी अवस्था डॉ ची झालेली दिसते.

'हजारो श्रद्धावान, धर्मावर विश्वास ठेवणारे काळा बाजार करतात तर जडवादी . अत्यंत त्यागी, मानवाच्या उद्धारार्थ जीवन समर्पित करणारे किती तरी दिसतात.' डॉ. ची श्रद्धावान व जडवादी यांच्याबाबतीतली ही दोन्ही विधाने एकांगी आहेत. श्रद्धावान काळा बाजार करतात म्हणजे काळा व जार करणे श्रद्धावान लोकांचा काही गुणधर्म नाही, तर जडवादी...समाजासाठी जीवन समर्पित करतात म्हणजे जीवन समर्पित करणे हा काही जडवाद्याचा गुणधर्म नाही. माझ्या मते तर, समाजहित व व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार करता श्रद्धावान व जडवादी सारखेच आहेत. कारण श्रद्धावान लोकानी व्यक्तीला देवाच्या पुढ्यात समारंभपूर्वक मारले तर जडवाद्यांचा देव आहे साम्यवाद! या देवापुढे नरमेध चालू आहे. एकूण काय तर अशास्त्रीय विचारात व्यक्तीला किंमत नव्हती तशीच अतिशास्त्रीय विचारातही व्यक्तीला किंमत नाही!

श्रद्धावान बुद्धिप्रामाण्याचा शत्रू असतो असे म्हणणेही चुकीचे आहे. कारण असे असते तर

'नवसे कन्यापुत्र होती,<br>
तर करणे न लागे पती

असे तुकारामाने म्हटलेच नसते किंवा

'लेकुरे उदंड झाली,<br>
तो ते लक्ष्मी निघोन गेली।<br>
बापडी भिकेस लागली।<br>
काही खाया मिळेना।'

अशा सरळ संततिनियमनाच्या प्रचारवजा ओळी रामदासानी लिहिल्याच नसत्या!

भारतीय बुद्धिप्रामाण्यवादी पाश्चात्यांचं अनुकरण करतात याचा डॉ ना बराच राग आलेला दिसतोय. खरं म्हणजे यात वाईट वाटण्यासारखं काही नाही आणि ही गैरसमजूतही नाही. हा बुद्धिप्रामाण्यावर केलेला आरोप आहे व तो मोठ्या प्रमाणात खराही आहे. आपण तो मान्य करायलाच हवा. असा आरोप करणाऱ्याला फक्त असेच उत्तर देता येईल की, 'आम्ही (बुद्धिप्रामाण्यवादी) टांग्याच्या घोड्यासारख्या (बुद्धिप्रामाण्यवादी नसणाऱ्यासारख्या) झापडा लावलेल्या नाहीत. त्यामुळे पाश्चात्य विचारही चांगले असतील तर ते आम्ही स्वीकारलेले आहेत. ते केवळ पाश्चात्य आहेत म्हणून त्याला विरोध करणार आणि संस्कृतीच्या नावाखाली 'वाटेल ते' अशास्त्रीय मानणार नाही. तसा बुद्धिप्रामाण्यवादाचा जन्म प्रबोधनाच्या सुरुवातीपासून गृहीत धरला तर मोठ्या प्रमाणात बुद्धिप्रामाण्यवाद पाश्चात्यांची देणगी आहे, यात मान्य न करण्यासारखं काही नाही व आपण तो स्वीकारला यातही चूक व वाईट काही नाही.

शेवटी बुद्धिप्रामाण्यवादी असावे हा एक भाग आणि बुद्धिप्रामाण्यवादी असणे हा दुसरा भाग. श्री. रघुनाथ कर्वे पूर्ण बुद्धिप्रामाण्यवादी होते तर आपण कुवतीप्रमाणे बुद्धिप्रामाण्यवादी आहोत. कारण बुद्धिप्रामाण्यवाद म्हणजे 'जाणिवेवर विश्वास नाही, तर तपासलेल्या जाणीवेवर विश्वास.' कर्वे बुद्धिप्रामाण्यवादी होते कारण श्रद्धेला त्याच्या विचारात अजिबात स्थान नव्हते. अगदी 'आई कोण, याबद्दल जशी खात्री असू शकते तशी बाप कोण याबद्दल असणं शक्य नाही.' थोडक्यात 'मातृत्व सत्य आहे, पितृत्व कल्पना आहे' हे स्वतःच्या बाबतीतदेखील ते बोलून दाखवत. कर्वेंना यासाठीच पूर्ण बुद्धिप्रामाण्यवादी म्हणायचं आणि आपणास शब्दप्रामाण्यवादी! कारण आपण प्रत्येक विचार तपासून स्वीकारतो असे नाही, तर तो कुणी तरी सांगितलेला आहे म्हणून स्वीकारतो. कुणी तरी सांगितले म्हणून देव फेका, सत्याग्रहात जा, निधर्मी, धर्मनिरपेक्षता चांगली म्हणा, आंतरजातीय विवाह करा हे स्वीकारत आणि सांगत असताना आपण शब्दप्रामाण्यवादी होतो, बुद्धिप्रामाण्यवादी राहात नाही.

तसे आपण बुद्धिप्रामाण्यवादीही पक्षपाती आहोत. कारण देवाला फुले वाहिली, कुणी पूजा केली की आपण टीका करणार! मात्र मोठमोठी माणसे पुष्पचक्रे वाहतात, कुणाला ईशदूत म्हणतात, माझी रक्षा गंगेत टाका म्हणतात, तेव्हा बुद्धिप्रामाण्याच्या टीकेला ती धार नसते, जी धर्माच्या विरोधी बोलण्यात असते.

१५ मे १९८१ — प्रा. बी. वाय. कुळकर्णी, जालना.

## थोडंसं बौद्धिक....

डॉ. शरद अभ्यंकर यांचे मननीय विचार. (बुद्धिप्रामाण्यवाद – काही गैरसमजुती, 'माणूस' दि. २५ एप्रिल) वाचनात आले.

धर्म या सकल्पनेबद्दल डॉक्टरसाहेब लिहितात—ज्याच्यावर आपले काहीच नियंत्रण नाही अशा गोष्टीबद्दल आंधळेपणाने अभिमान बाळगणे योग्य आहे का? तर्कदृष्ट्या प्रश्न योग्य आहे धर्मच काय, आपण ज्या

राष्ट्रात जन्मलो त्या राष्ट्राच्या राष्ट्रीयत्वावरसुद्धा आपले नियंत्रण अजिबात नसते. आदर्श बुद्धिप्रामाण्यवाद्याने स्वतःच्या राष्ट्रीयत्वाचाही वृथा अभिमान सोडला पाहिजे. परकीय राष्ट्राचे सैनिक आमच्या देशात घुसले, तर बु. प्रा. वाद्याने हिमालयासारखे अविचल राहायला पाहिजे. आक्रमकाचा धर्म-जातही होमो सॅपिन्सच ना? तेही आमच्या प्रदेशात येऊन राहिले तर बिघडले कुठे? केवळ आमचे बापजादे या प्रदेशात राहात होते, म्हणून आम्ही या प्रदेशाला आमचा प्रदेश म्हणतो. वस्तुतः कोणत्याही प्रदेशावर कुणाचेच नियंत्रण नसते. लिओ टॉलस्टॉयच्या जगप्रसिद्ध कथेत म्हटल्याप्रमाणे अखेर माणसाला जमीन लागते तरी किती? इतकेच काय, कुणाही परक्याने आमच्या आया-बहिणींचा हात धरला तरीसुद्धा बु. प्रा. वाद्याने धर्मराजासारखे शांत बसायला पाहिजे. अमुक एक स्त्री ही माझी आई असणे किंवा बहीण असणे या गोष्टीवर माझे स्वतःचे असे काहीच नियंत्रण नसताना मी या नात्यांचा वृथा अभिमान का म्हणून बाळगावा? शास्त्रीयदृष्टया देशी गाईंना दर्जेदार वळूच्या वीर्याचे इंजेक्शन देऊन संकरित गायी निर्माण करणे उत्तम. मग हेच तत्त्व माणसांच्या बाबतीतही का वापरू नये? जन्म घेणे हीसुद्धा आपले स्वत.चे यत्किंचितही नियंत्रण नसलेली व आपल्या अगदी अजाणता घडलेली क्रिया आहे. मग ज्या बापापासून आपण जन्मलो, त्याचे नाव कशाला लावायचे? आदर्श बुद्धिवाद्याने तर खुद्द बापानेच ब्लड टेस्टचे रिपोर्ट दाखविल्याशिवाय त्याचे पितृत्वसुद्धा स्वीकारता कामा नये.

कोणत्याही गोष्टीचे यथार्थ ज्ञान दुर्मिळच. यथार्थ ज्ञान नसेल, तर सरळ अज्ञान परवडले—पण अर्धवट ज्ञान मात्र अतिघातक. कंपाउंडरच्या अनुभवाच्या बळावर डॉक्टरकीचे सर्टिफिकेट संपादन केलेल्या एका महाभागाची एक गोष्ट सांगतात. एकदा एक बेशुद्ध पडलेला पेशंट त्याच्यासमोर आणण्यात आला. त्याच्या पूर्वानुभवात त्यांनी असली केस कधीच हाताळली नव्हती. बेशुद्ध माणसाला कांदा हुंगवतात एवढेच त्याना माहीत; पण आपणही कादा हुंगवला तर इंजेक्शनचे पैसे कसे मिळायचे? डॉक्टरमहोदयांनी तात्काळ एक आयडिया लढवली. त्यानी सरळसरळ कांद्याचा रस काढून तो पेशंटला इन्ट्राव्हेनस ठोकून दिला. बिचारा पेशंट एकाच झटक्यात 'कायमचा बरा' झाला!

डॉ. अभ्यंकरांचा विचारपूर्वक लेख आणि कांद्याच्या रसाचं इंजेक्शन यामध्ये विलक्षण साधर्म्य आहे. डॉक्टरसाहेबानी मांडलेला विचार बरोबर आहे, तर्कदृष्टी निर्दोष आहे—पण ज्या माध्यमात या दोहोची सांगड घालावयास पाहिजे ते माध्यम चुकले तिकडे पेशंट प्राणाना मुकला आणि इकडे 'माणूस' तीन-चार (वाया गेलेल्या) पानांना मुकला.

शास्त्रीय दृष्टिकोन जोपासणे हे बुद्धिप्रामाण्यवाद्यांचे कार्य निश्चितपणे स्वागतार्हच आहे; परंतु केवळ शास्त्रीय दृष्टिकोन हे जीवनाचे सारसर्वस्व नव्हे. सनईच्या पोकळीतून किंवा मासळी बाजाराच्या परिसरामधून स्वरसमुच्चयच पैदा होत असतात; परंतु मासळी-बाजारामधला गोंगाट म्हणजे संगीत नव्हे. मनाला प्रसन्न करणारे संगीत निर्माण करायचे तर शुद्ध स्वर, कोमल स्वर, वर्ज्य स्वर, ताल, सुरावट, लय इत्यादी असंख्य यम-नियमाचे पालन अटळ आहे. वाचनालय, क्रीडांगण, शाळा किंवा रुग्णालय याची अत्यंत आवश्यकता असतानाही त्या ठिकाणी दारूची दुकाने, पान-बिडीच्या टपऱ्या, जुगारीचे अड्डे, वेश्यांच्या गलिच्छ वस्त्या, उकिरडे वाढत असल्याची गोष्ट डॉक्टरसाहेबाना खटकत नाही. त्याना देवळे, मशिदी किंवा चर्च तेवढी खटकतात. समाजाला नासवणाऱ्या वस्तूची किंवा वास्तूची वाढ थोपविण्याचे सामर्थ्य बुद्धिप्रामाण्यवाद्याच्या अंगी नाही. मग ते देऊळ आहे का दारूचा गुत्ता आहे या उठाठेवी कशाला? प्रभावी लशीचा शोध लागल्याने देवी, कॉलरा इ. साथीच्या रोगाचे भय जसे राहिले नाही, तसेच प्रभावी प्रतिजैविकामुळे गुप्तरोगांचा धसकाही आता उरलेला नाही. असल्य वेश्यांच्या माड्या चढ़नही केसाला धक्का न पोहोचू देणारी औषधे बाजारात उपलब्ध आहेत व त्यांची विक्री दिवसेंदिवस प्रतिपच्चन्द्ररेखेव वर्धिष्णु अवस्थेत आहे. कुटुंब-नियोजनाची साधने आता शाळकरी मुलाच्या दप्तरातही कधी कधी आढळतात!

बुद्धिप्रामाण्यवादी मंडळी दृष्टीला शास्त्रीय कोन देऊ शकतात; पण चांगली दृष्टी निर्माण करणे त्यांच्या आवाक्यातील गोष्ट नव्हे! जोपर्यंत जगातील तमाम मानवजात सत्प्रवृत्तच बनेल असा एखादा पेटंटेड औषधी वा अन्य स्वरूपाचा शास्त्रीय फॉर्म्युला निश्चित नाही, तोपर्यंत देवळाची परंपरागत अंधश्रद्धास्थानं पाडून टाकायची अवाजवी घाई कशाला?

आता फलज्योतिषासंबंधी एखाद्या रुग्णाला वाई शहरामधल्या सर्व डॉक्टरांपुढे ठेवल्यास सर्व डॉक्टराचे निदान, औषधयोजना इ. एकच येतील याची खात्री खुद्द डॉ. अभ्यंकरसाहेब देऊ शकतील का? वस्तुतः वैद्यकीय शास्त्र हे प्रगत वैज्ञानिक शास्त्र असल्याने अशी अपेक्षा करणे अवाजवी ठरणार नाही जसे शहरातले चार डॉक्टर पोटार्थी, तसे चार पेपरांमधून भविष्य लिहिणारे बिचारे ज्योतिषीही पोटार्थीच! एका व्यावसायिकाने दुसऱ्या व्यावसायिकास दोष न देण्यातच परस्पराच्या व्यवसायाची प्रतिष्ठा सांभाळली जाते. जेव्हा आपण एक बोट दुसऱ्याच्या दिशेने रोखतो, तेव्हा आपलीच तीन बोटे आपणाकडेच उलट रोखलेली असतात, हे ध्यानात ठेवावयास पाहिजे!

मानवतावाद हाही अखेरीस एक धर्मच आहे व मानव हे या धर्माचे अंतिम श्रद्धास्थान आहे. शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला असता पाच—पंचवीस अणुस्फोटांनी भारताची अवाढव्य लोकसंख्या अवघ्या काही सेकंदात निम्म्यावर आणता येईल आणि प्रचंड लोकसंख्येमुळं भेडसावणारे अनेक प्रश्न चुटकीसरशी निकालात काढता येतील; परंतु मानवतावादरूपी धर्म आपणास हे करू देत नाही. जगातील कुठलाच धर्म हिंसा, व्यभिचार, पापाचरण याची शिकवण देत नाही. वर्गात गुरुजींनी हरप्रयासाने शिकवूनही काही विद्यार्थी परीक्षेत नापास होतात, हा दोष गुरुजींचा, पुस्तकांचा वा शिक्षणाचा नव्हे; तद्वत् धर्माचरणी लोकामध्येही दुष्प्रवृत्त लोक असतात हा खचितच धर्माचा दोष नव्हे! माझ्या शेजारचा माणूस बुद्धीनं फारसा प्रगल्भ नाही, स्वतःच्या धर्माचे रक्षण करण्यासाठी तो तलवार घेऊन उभा आहे, तो फक्त स्वतःचाच धर्म जाणतो व त्याच्या धर्मात नसलेल्यांना नष्ट करण्याचे मनसुबे रचतो—

मलपृष्ठ १ वर

पुणे वार्ता

# साहित्यपरिषदेचा अमृतमहोत्सव

पुण्यातल्या महाराष्ट्र साहित्यपरिषदेचा अमृतमहोत्सव गेल्या आठवड्यात मोठ्या थाटामाटाने पार पडला. केंद्रीय माहिती व नभोवाणीमंत्री श्री. वसंत साठे यांनी २७ मे रोजी महोत्सवाचं उद्घाटन केलं. त्यानंतर २७ व २८ मे, असे दोन दिवस परिसंवाद, कविसंमेलन, परिषदेच्या जुन्या कार्यकर्त्यांचे व माजी पदाधिकाऱ्यांचे मेळावे असे भरगच्च कार्यक्रम आखण्यात आले होते.

याचबरोबर २७ मे रोजी सकाळी पुण्यातल्या नागनाथपाराजवळ चिंतामणी सहकारी गृहरचनेच्या आवारात एक आगळा कार्यक्रम पार पडला. ही गृहरचना संस्था निर्माण होण्यापूर्वी इथे असणाऱ्या मळेकर–वाड्यात १९०६ साली साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर यांनी महाराष्ट्र साहित्यपरिषदेच्या स्थापनेची घोषणा केली होती व लोकमान्य टिळकानी या घोषणेला अनुमोदन दिलं होतं. त्या वर्षी चौथे ग्रंथकारसंमेलन या मळेकर–वाड्यात भरलं होतं. या घटनेची स्मृती म्हणून २७ मे रोजी सकाळी या ठिकाणी या ऐतिहासिक घटनेची नोद ठेवणारा एक फलक लावण्यात आला. परिषदेचे जुने कार्यकर्ते श्री. मो. शा. शहाणे यांनी या प्रसंगी फलकाला हार घातला. त्यांच्याबरोबरच केंद्रीय मंत्री श्री. वसंत साठे, ' माणूस ' चे संपादक श्री. ग. माजगावकर यानीही फलकाला हार घातले.

त्यानंतर याच इमारतीतल्या ' माणूस ' कार्यालयात छोटासा, अनौपचारिक कार्यक्रम झाला. त्यामध्ये श्री. माजगावकर, श्री. शहाणे व श्री. साठे यांची समयोचित भाषणे झाली. नव्या गृहरचना संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती पाटील यानी आभार मानले.

समारंभाला आलेल्या सर्वांना अत्तर, गुलाब, चाफ्याचं फूल आणि पेढा देऊन समारंभ साजरा करण्यात आला. प्रसिद्ध विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. गं बा. सरदार, परिषदेचे अध्यक्ष प्रा. वसंत कानेटकर, कार्याध्यक्ष डॉ. वि. रा. करंदीकर, कार्यवाह म. श्री. दीक्षित, अमृतमहोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. वसंतराव पटवर्धन, प्रा. द. मा मिरासदार, प्रा. राम शेवाळकर, 'सकाळ'चे संपादक श्री. ग. मुणगेकर, 'तरूण भारत'चे संपादक वि. ना. देवधर, 'सोबत'चे संपादक ग. वा. बेहरे इत्यादी नामवंत मंडळी या कार्यक्रमाला उपस्थित होती.

त्याच दिवशी संध्याकाळी अमृतमहोत्सवाचा मुख्य समारंभ टिळक स्मारक मंदिरात आयोजित करण्यात आला होता. संध्याकाळी साडेसहापूर्वीच रंगमंदिर तुडुंब भरलं.

समारंभाला सुरूवात झाली. परिषदेचे अध्यक्ष प्रा. वसंत कानेटकर उपस्थितांचं स्वागत करायला म्हणून उभे राहिले आणि त्यांनी परिषदेवर टीका करणाऱ्यांचा समाचार घेण्याचंच कार्य आरंभलं. परिषदेविषयी वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेलं लिखाण अज्ञानातून व खोडसाळपणातून लिहिलं गेलं आहे, असंही प्रा. कानेटकरानी बजावून सांगितलं. महोत्सव, मैफील आणि मुकाबला या तीन 'म' कारातून कोणतंही कार्य उभं राहात असल्याचं कानेटकरांनी सांगितलं; पण यामागे शाब्दिक कसरतीतून निर्माण झालेल्या किंचित गोडव्यापलीकडे तात्त्विक स्पष्टीकरण फारसं नव्हतंच.

परिषदेचे कार्यवाह प्रा. न. म. जोशी यांनी राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, केंद्रीय शिक्षणमंत्री कवी कुसुमाग्रज, कवी यशवंत, माजी खासदार पु गं. मावळकर इत्यादीकडून परिषदेच्या अमृतमहोत्सवानिमित्त आलेले शुभसंदेश वाचून दाखवले; पण या संदेशांमध्ये महाराष्ट्राच्याच मुख्यमंत्र्यांचा, राज्यपालांचा किंवा अन्य कोणाही ज्येष्ठ शासकीय अधिकाऱ्याचा संदेश नव्हता, ही गोष्ट मात्र खटकली!

समारंभाचे उद्घाटक श्री. वसंत साठे यांचं भाषण म्हणजे तर ऐतिहासिक नाटकातली एकामागून एक चाललेली ' स्वगतं ' वाटली. श्री. साठे मनसोक्त बोलले हे खरे !

त्यानंतर यंदा अकोला इथे पार पडलेल्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष श्री. गो नी. दांडेकर यचं समारंभाला शुभेच्छा देणारं भाषण झालं. संमेलनाध्यक्षाला समारंभाच्या नियोजित कार्यक्रम–पत्रिकेत कुठेही स्थान देण्यात आलं नव्हतं, ही गोष्ट मात्र योग्य वाटली नाही.

दांडेकरांनंतर मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. मधुकर अष्टीकर बोलले. आधी संमेलनाध्यक्षाच्या निवडणुकीसाठी - उभं राहाणं, नंतर माघार घेणं, त्यानंतर आता १९८३ साली लंडनमध्ये मराठी साहित्य संमेलन भरवण्याची त्याची कल्पना ! या समारंभातलं त्याचं भाषण या सर्वाशी सुसंगती राखणारंच होतं. आपल्या भाषणानं त्यानी समारंभाचं जे काही थोडं वातावरण निर्माण झालं होतं त्याचाही पार विचका करून टाकला !

शेवटी समारंभाचे अध्यक्ष श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं भाषण झालं. शास्त्रीबुवांनी नेहमीच्या शैलीत काही आठवणी सांगत, काही विचार देत भाषण रंगवलं. दोन-चार कानपिचक्याही दिल्या.

परिषदेचे कार्यवाह म. श्री. दीक्षित यानी आभार मानल्यावर सुमारे दोन-अडीच तास चाललेला हा समारंभ संपला.

'Too many cooks spoil the food' या उक्तीचंच अतिशय प्रभावी प्रत्यंतर या समारंभानं आलं. समारंभात व्यासपीठावर आणि श्रोतृवर्गातही मातब्बर मंडळी बसलेली होती, आपापल्या परीनं बोलत होती, ऐकत होती; पण कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नव्हता ! सगळं आपलं दिशाहीनपणानं, पसरटपणे चाललेलं होतं. कुठं तरी सुरुवात केली होती, म्हणून कुठं तरी थांबायलाही हवं होतं, एवढी तरी जाणीव संयोजकांनी ठेवल्यामुळंच हा समारंभ एकदाचा संपला !

पंचाहत्तर वर्षं अव्याहतपणे कार्य करणाऱ्या साहित्यिकांच्या एका ख्यातनाम संस्थेचा अमृतमहोत्सवाचा समारंभ या दर्जाचा व्हावा, याचं मनस्वी वाईट वाटलं. समारंभाला बहुतेक सर्व ज्येष्ठ आणि मान्यताप्राप्त साहित्यिक आवर्जून अनुपस्थित होते, हेही खटकलं. संस्था आणि साहित्यिकांचा काही संवादच राहिलेला नाही,-हे प्रकर्षानं जाणवलं. पुढल्या पंचवीस वर्षांत परिषदेनं किमान हा संवाद निर्माण करण्याचं कार्य जरी नीटपणे पार पाडलं तरी खूप काही मिळवल्यासारखं होईल व शतसांवत्सरिक महोत्सव जास्त दिमाखानं साजरा होऊ शकेल !

—सतीश कामत

# एक साहेब, एक लोकप्रतिनिधी आणि एक विडी–कामगाराचा मुलगा

आमचं एक मंडळ आहे. मंडळाचे कार्यकर्ते निरनिराळ्या राजकीय विचारांचे.

पण आपले 'जोडे' बाहेर ठेवून मंडळाचं काम करणारे.

चार्टर्ड अकाउन्टंटपासून कंपाउंडरपर्यंत. सर्व तरूण.

सतरंज्या अंथरण्यापासून स्टेजवर वावरण्यापर्यंत कोणावर कोणतंही काम सोपवा— बिनबोभाट पार पडतं.

गेल्या महिन्यात आम्ही एक व्याख्यानमाला आयोजित केलेली.

व्याख्याते सुप्रसिद्ध सेवा संस्थाच्या मदतीसाठी म्हणून व्याख्यानमाला करणारे. शिवाय व्याख्यानमालेतून जमा होणारी रक्कम आदिवासी भागात चालणाऱ्या वसतिगृहांना देण्याचा मानस आम्ही जाहीर केलेला.

या व्याख्यानमालेच्या प्रवेशपत्रिका विकण्यासाठी आम्ही शहराच्या सर्व भागांतून फिरलो.

तालुक्याच्या एका उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकाऱ्याकडे गेलेलो.

चांगले व्याख्याते–स्तुत्य हेतू, चागला सांस्कृतिक उपक्रम यामुळं साहेब खूष होतील, आवश्यक ती शासकीय मदतही करतील, निदान आपली प्रवेशपत्रिका तरी नक्कीच घतील !

साहेबानी बसा म्हटलं नाही.—आम्ही बसलो.

प्रयोजन–हेतू सांगितला. माहिती दिली. एक दहा रुपयाची प्रवेशपत्रिका घेण्याची विनंती केली.

साहेबानी काही न बोलता दहा रुपये हातावर ठेवले.

प्रवेशपत्रिका हातात घेतली आणि आम्हाला सुनावलं, 'आमच्यासारख्याना तुम्ही आमन्त्रित करायला पाहिजे, तर तुम्हीच आम्हाला विकत देता !'

बोलण्याचा सूर 'कमाल आहे तुमची. आम्हाला प्रवेशपत्रिका विकत देणारे तुम्हीच पहिले !' असा होता.

'खुद्द व्याख्यात्यांचा प्रवेशपत्रिका विकत घेण्याचा रिवाज आहे आणि आम्ही राबणाऱ्या कार्यकर्त्यांनीही प्रवेशपत्रिका विकत घेतल्यात !' असं सुनवावंसं वाटलं; पण आवरलं. कार्यक्रमात उगीच यांच्या रुष्टतेनं विघ्न उपटायला नको (!) म्हणून.

¤

असाच एक लोकप्रतिनिधी.

नगरपालिकेचा सदस्य. भरघोस मतानी निवडून गेलेला. लोकाच्या लहान–मोठ्या तक्रारी सोडवाव्यात, पाणी वेळच्या वेळी पुरवलं जाईल इकड बघावं, स्वच्छता बघावी, निदान विचारपूस करावी अशी लोकांची यांच्याकडून माफक अपेक्षा.

तर याच्या 'मतदारसंघा'तील एक दोन लाइटच्या ट्यूब्ज लागत नव्हत्या. सगळा रस्ता अंधारात बुडायचा. धडपडत चालावं लागायचं.

रात्री पिक्चर–प्रवचनाहून येणाऱ्यांची अडचण व्हायची. धडपडायला व्हायचं.

एका जागृत (!) मतदाराच्या ही गोष्ट लक्षात आली.

रीतीप्रमाणं तो आपल्या प्रतिनिधीला भेटला.

मतदारानं अडचण सांगितली. प्रतिनिधीनं त्याला आपादमस्तक न्याहाळलं आणि सुनावलं, 'परत कोणती कामं, अडचणी, तक्रारी घेऊन येऊ नका. मी काही रिकामटेकडा नाही तुमची कामं करायला आणि फुकट निवडून आलेलो नाही—प्रत्येकाला त्याच्या मताची पुरेपूर किंमत मोजलीये. मी कामं करायला बांधलेलो नाहीये !'

आपल्या मताची 'किंमत' कळलेला तो जागृत (?) मतदार गप्प झाला !

¤

एक विडी-कामगाराचा मुलगा.

विडी-कामगाराच्या घरची असावी तशीच त्याच्याही घरची परिस्थिती मुलगा अतिशय हुशार, हुन्नरी !

घरून नेलेल्या आठ आठ दिवसाच्या शिळ्या भाकरी चटणीवर राहून चार्टर्ड अकाउन्टंट झालेला !'

सकाळी चारला सुरू होणारा त्याचा दिवस रात्री अकरा-बाराला संपतो. आपला व्यवसाय सांभाळूनही आज ते निरनिराळ्या 'सामाजिक उपद्व्यापात' आघाडीवर असतात. निरनिराळी उत्सवमंडळं, सांस्कृतिक संघटना, बैठका, सभा-सम्मेलनांबरोबरच आपल्या आदिवासी-भागातल्या वसतिगृहाच्या वर्षभराच्या बेगमीपासून ते अगदी सुट्टीत चार-सहा मुलांना कुठं कुठं कामाला लावायचं इतपत चिक्कार उपद्व्यापात मग्न असतात.

व्यवसायाला लागल्यावर 'धन हेच ध्येय' मानून कुटुंबकबिला सांभाळत, आपली प्रतिष्ठा कुरवाळत, 'आठ-आठ दिवसाच्या शिळ्या भाकरीचे तुकडे मोडत होतो तेव्हा कुठे गेला होता तुमचा समाज', असा आक्रोश करत ते बसले नाहीत.

त्याच्याकडं गेलं की ते हनुवटीवरची दाढी कुरवाळत एखादी नवी योजना सांगायला लागले की अशा 'मोडक्या माणसांच्या' अनुभवानं आलेलं नैराश्य कुठल्या कुठं पळून जातं !

'घरचं खाऊन लष्कराच्या भाकरी भाजणारी (?)' अशी मंडळी थोडी असली तरी आहेत ही गोष्टच भक्कम दिलासा आणि हुरूप द्यायला पुरेशी आहे.

—विनय गुणे
संगमनेर.


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की
सुमती देवस्थळे
मूल्य वहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## उत्तरमीमांसा : ८ :

स. शि. भावे

# हुंडा, मानपान, करणी इत्यादी

कवी पुरुषोत्तम पाटील फार त्वेषाने बोलत होते. पुरुषोत्तम पाटील हुंड्याच्या राक्षसी चालीवर फार त्वेषाने बोलत होते. 'अनुष्टुभ' चे संपादक पुरुषोत्तम पाटील हुंड्याच्या चालीविरुद्ध त्वेषाने बोलत होते.

प्रसंग होता जळगाव जिल्हा ग्रामीण साहित्य संमेलनातील परिसंवादाचा. 'ग्रामीण साहित्य : काल, आज व उद्या' असा परिसंवादाचा विषय होता. साहित्य-संस्कृति-मंडळाचे सदस्य पुरुषोत्तम पाटील बोलत होते, हुंड्याच्या चालीविरुद्ध कडाडून बोलत होते.

१९ मे. जळगावजवळ चार मैलावरचे असोदे. बहिणाबाई चौधरीचे गाव. गावच्या हायस्कूलच्या आवारात मांडव टाकलेला. वेळ दुपारची. टळटळीत तीनची. सूर्य शाळेच्या इमारतीमागे दोनच अंगुळे कललेला. समोर स्त्री–पुरुष तीन-साडेतीनशे श्रोते. शंभर एक तरुण. पंन्नास-साठ स्त्रिया. सारे तन्मयतेने ऐकत होते. मधून मधून टाळ्या देत होते. पाटील आवेशाने बोलत होते.

व्यासपीठावर अध्यक्ष ना. धो. महानोर. संमेलनाध्यक्ष आनंद यादव, रा. रं. वोराडे, बाजीराव पाटील, शिवाजीराव सावंत, मी.

सारेच जरा कुतुहललेले. पुरुषोत्त पाटलाना एवढा आवेग का आला आहे? त्यांच्या डोळ्याच्या कडा का पाणावल्या आहेत? त्यांचा आवाज असा का कापतो आहे?

पाटील बोलतच होते, 'तर जी ही हुंड्याची राक्षसी चाल ग्रामीण भागात एवढी त्रासदायक नव्हती ती चाल आता या नव्या श्रीमंतीमुळे आमच्याकडे घुसली आहे. आई-बाप, मुलगी, संसारच्या संसार या लाटेत वाहून जातायत.... अशा नव्या ग्रामीण समस्यांची दखल नव्या ग्रामीण साहित्यांनं घेतली पाहिजे!'

पुरुषोत्तम पाटील फार हळवे आहेत हे मला माहीत होते. तरीही त्यांचा हा आवेश मला नीटसा समजत नव्हता.

तेवढ्यात माझी नजर एका बातमीकडे गेली. जळगावच्या एका स्थानिक दैनिकाने दुकॉलमी मथळा दिला होता : कन्यादानापूर्वीच पित्याची विष पिऊन आत्महत्या!

खाली मजकूर होता : 'देऊळगाव गुजरी येथील मांगो विठोबा साखरे (४४) हा इसम १६ मेच्या दुपारी ३ वाजता घरात मृतावस्थेत आढळून आला.' पुढे मजकूर होता :

'मांगो साखरे याच्या मुलीचे लग्न चार दिवसांनी होणार होते. हुंडा, मानपान व करणी याबद्दल कबूल केलेली रक्कम सदर इसमास देता येणे शक्य नव्हते. म्हणून मृत्यूपूर्वी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीत, आपल्या मुलीस पदरात घ्यावे, अशी विनंती मागोने भावी व्याह्यास केली असल्याचे समजते.'

पाटील बोलत होते, 'मुलीला सासरी पाठविताना आमच्याकडे मुलीकडील माणसाची मने काळजीने भरून गेलेली असतात.'

मी ऐकत होतो. अनेक बातम्या आठवत होत्या. 'स्टोव्हवर पदर पडून भाजल्याने ससूनमध्ये दाखल केले. वय २१'. 'सासऱ्याने रॉकेल टाकून जाळण्याचा प्रयत्न केला. अत्यवस्थ अवस्थेत सरकारी दवाखान्यात दाखल. वय १८'. दिवसाला दोन-तीन बातम्या तर असल्या असतातच. मन गंभीर झाले. परिसंवादाच्या मूळ विषयापासून थोडे दूर गेले.

... आपण सारे खरेच इतके मागासलेले आहोत का? जर असू तर श्रीहरीकोटा येथून उड्डाण केलेले 'एस्एल्व्ही ३' यात कुठे बसते? ...

अकोल्याचे बाजीराव पाटील बोलत होते त्यांच्या खास वऱ्हाडी-विनोदी ढंगाने. लक्ष त्यांच्याकडे ओढले गेले. ते म्हणाले, 'हुंड्याएकी तक्रारी काढून करून राहिले? तुमालाच ना त तुमच्या लेकीलागे इंजनेर नवरा लागत असतो? तुमीच त या नवऱ्या मुलाना लाडावून ठेवलेत. तो आपल्या पोट्टीले चालीस हजार मोजतो त मी माज्या पोट्टीले साठ हजार मोजतो असं तुमीच म्हन्ता ना? का म्हना नाई म्हनत म्हून'.

बाजीराव पाटलांच्या या टोल्याला सगळ्यानी हसून 'हो' म्हटले. पोक्त स्त्रियांनी विशेषच हो म्हटले.

मला कळेना. मुली जळतात, जाळल्या जातात. मग या ऐकणारांचा हा मोठा 'हो' कसा काय?

¤

पुण्यास परतलो. दोन-चार दिवसांची वृत्तपत्रे पडली होती. चाळू लागलो.

पुण्याच्या एका महत्त्वाच्या दैनिकात दुकॉलमी मथळा होता. हुंडापद्धत वाढत असल्याचे संसदीय समितीचे मत. बातमी अशी होती :

'पुणे : सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात प्रगत असणाऱ्या राज्यातून विवाहप्रसगी देण्यात किंवा घेण्यात येत असलेल्या हुंड्याची प्रथा दिवसेंदिवस कमी होण्याऐवजी वाढतच आहे.

'हुंडाप्रतिबंधक कायद्याच्या कार्यपद्धतीचा विचार करण्यासाठी आणि कायद्यात दुरुस्त्या सुचविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या ससद–सदस्यांच्या समितीच्या अध्यक्षा कृष्णा साही यांनी ही माहिती गुरुवारी येथे पत्रकार-परिषदेत दिली...गोवे येथील समितीची बैठक संपवून ही समिती काल पुण्यात आली.'

म्हणजे, पुरुषोत्तम पाटलाची तक्रार होती की ग्रामीण भागात या प्रथेचा जाच वाढतो आहे. संसद् समितीचे मत पडले की, प्रगत राज्यातही ही प्रथा वाढते आहे.

जर जाचक आहे तर प्रथा वाढते आहे ती कशी? कुणाला तरी ही प्रथा पथ्यावर पडत असल्याखेरीज प्रथा वाढत नाही, वाढणार नाही. मग हुंड्याची ही प्रथा कुणाच्या पथ्यावर पडते? कधी त्यांच्या, तर कधी माझ्या, अशा सर्वांच्याच पथ्यावर पडते का? असे दिसते की, या प्रथेत जसे कष्ट आहेत, तसे काही समाधान, काही उपयुक्ततादेखील

आहे. कोणती आहे ही उपयुक्तता ? समाजशास्त्र सांगते की, कोणत्याही सामाजिक संस्थेला किमान सामाजिक उपयुक्तता असल्याशिवाय ती संस्था टिकू शकत नाही. हुंड्याची अशी उपयुक्तता कशी शोधावी ? कशी मापावी ?

¤

दोन दिवस झाले होते सकाळी मित्र आला होता. त्याच्या मुलाच्या लग्नाला जाता आले नव्हते.

'तू यायला हवा होतास.' तो म्हणाला, 'लग्न झाले. थाटात झाले. सगळे खूष झाले. जाताना मुद्दाम थाबून मला त्याचे समाधान सागून गेले.'

'तुझा खर्च किती झाला ?' मी विचारले. मी अजून हुंड्याच्या ताणात होतो.

'माझा कसला आलाय खर्च ? आपला वरपक्ष ना ?'

'म्हणजे काय ? मुलीच्या बाजूला खड्डयात पाडलंस ?' मी विशेष आश्चर्याने विचारले. कारण मित्र आमच्या 'हुंड्याविरोधी गटाचा' सदस्य होता.

'छे, रे ! मी सुरुवातीलाच सागितलं की, मुलीशिवाय आम्हाला काही नको. तर मुलीचे वडील म्हणाले, 'अहो, हा तुमचा मोठेपणा झाला; पण आम्हाला काही आहे की नाही ? शिवाय ही आमची एकुलती एक मुलगी ! आम्हाला हौसेनं करायचंय कार्य. तुम्ही प्लीज त्यात मोडता घालू नका ! अहो, तुम्ही काही मागत नाही नि आम्ही काही देत नाही, असंच समजा !' तर मी म्हटलं, 'तुमची हौस तरी काय आहे ?'

'मग मुलीचे वडील पुन्हा म्हणाले, अहोऽ, फार नाही. फक्त रीतीचं करायचं. मुलीच्या अंगावर रीतीचे सगळे जिन्नस आम्ही घालणार ! ते सुमारे पंधरा ते वीस तोळे होतील !' 'म्हणजे पसतीस ते चाळीस हजार रुपये.' मी मनाशी म्हटलं.

'शिवाय', ते पुढे सागू लागले, 'दोन्हीकडचा खर्च. म्हणजे त्यात मुबईचं आमचं आणि पुण्याच तुमचं अशी दोन्ही रिसेप्शन्सही आली. नंतर दोघाची आठ दिवसांची काश्मीरची ट्रिप. विमानाची तिकिटं आम्ही काढू. शेवटचं, मुलीच्या संसाराला केवळ थोडी सुरुवात म्हणून गॅस, फ्रीज, गीझर, वॉशिंग मशीन, असं थोडं थोडं देऊ. एकुलती एक मुलगी ! तिच्या कौतुकासाठी एवढी तयारी म्हणजे काय फार झाली ?' आमचे व्याही सागत होते.

'नाही नाही म्हणत चांगलाच लग्गा साधलास !'–मी.

'मी तरी काय करणार ? खर तर व्याही आधुनिक वृत्तीचे आहेत. म्हणाले, 'माझा काही हा बेत नाही. आमच्या वडिलानी आग्रह धरला; माझ्या एकुलत्या मुलीचा, म्हणजे त्यांच्या नातीचा, सारा थाट पाहायचा होता त्याना. म्हणाले, माझे डोळे मिटण्यापूर्वी एवढं मला पाहू दे ! मग आपण त्यांच्यापुढं काय म्हणायचं अन् प्रपादायचं ? अगदी अनिच्छेनं करतोय असं समजा आणि सारी कलमं पास करून टाका !' मग माझा निरुपाय झाला.' मित्र म्हणाला.

'तुझा नाही, तर तुझ्या व्याह्यांचा या कार्यात एकूण खर्च किती झाला ?' माझ्या प्रश्नांतील आग्रह मी कायम ठेवला.

'तसे अडतीस हजार; पण एकूण म्हणायचे म्हणजे चाळीस-पंचेचाळीस होतील.' मित्राने अभिमानाने सागितले. हा अभिमानाचा आविष्कार म्हणजे स्वतःच्या मुलाची उत्कृष्ट किंमत मिळालेल्या मनाच्या समाधानाचा उद्गार होता.

'या अडतीस किंवा पंचेचाळीस हजारानी तुझ्या मुलाचा आणि कुटुंबाचा मोठेपणा इष्टमित्राच्या नजरेस आला हे मला मान्य आहे; पण ज्या तुझ्या व्याह्यानी इतकी रक्कम खर्च केली, त्याना एवढ्या खर्चातून काय मिळालं ?' मी मोठ्या आत्मविश्वासानं विचारलं. या प्रश्नासाठी माझ्या मित्राजवळ उत्तर नसणार अशी जवळजवळ माझी खात्री होती; पण मित्रानं शातपणे माझ्या खात्रीचा फुगा फोडला तो म्हणाला,

'हे बघ. नीट बघितलेस तर या पचेचाळीस हजारात माझ्या व्याह्यांनी खूपच साधलं आहे हे तुझ्या लक्षात येईल. या पचेचाळीस हजारात माझ्या सुनेच्या अंगावरचे दागिनेच आहेत वीस-बावीस हजाराचे. आम्ही हुंडा घेतला नाही म्हणून हे सालंकृत कन्यादान. आता हे दागिने त्याच्या मुलीच्याच मालकीचे राहणार की नाही ? उरल्या रकमेपैकी मोठा खर्च जेवणाचा अन् स्वागतसमारंभाचा. आठशे लोक जेवले. सुमारे तेवढेच स्वागताला आले. गेल्या तीस-चाळीस वर्षांतला आमच्या व्याह्यांचा हा लोकसंग्रह ! या साऱ्याना जेवाय-फराळाला बोलवायचंच असतं कधी ना कधी. लग्न-मुंज-सत्यनारायण ही म्हणजे सध्या 'लेजिटिमेट' निमित्तं झाली आहेत. आता लग्नाला येऊन याच्या आनंदात भागीदार झाल्याचं समाधान या दीड-एक हजार माणसांना मिळालं. त्याचा स्वल्प पाहुणचार करण्याचं समाधान व्याह्याना मिळालं. असा हा सारा खर्च नीट कारणी लागला आहे. शिवाय हा उत्तम रीतीने मिळविलेला पैसा आहे, दोन नंबरचा नव्हे. या उजळ पैशानं आमच्या व्याह्यानी साधं सुख दिलं आणि मिळवलं यात त्यांचं काय चुकले ?'

'पण हे सारं तू हुंडा घेतला नाहीस म्हणून शक्य झालं.' मी माझ्या हुंडाविरोधी भूमिकेला आधार शोधला.

माझ्या मित्रानं आज माझा सर्वच आघाड्यांवर पराभव करायचा निश्चय केलेला दिसला. तयारी करून आल्यासारखा बोलू लागला,

'मी नाही हुंडा घेतला; पण मुळात हुंड्यानं इतकी हुडहुडी भरायचं कारण नाही, असं मला वाटतं.'

'म्हणजे काय तू हुंड्याचं समर्थन करतोस ?' मी रागानं विचारलं.

'मला कुठल्याच सक्तीचं समर्थन करायचं नाही; पण लग्नाच्या वेळी वडिलानी आणि आईनं आपल्या मुलीला स्वखुषीनं काही दिलं तर लगेच तडातडा करायचं कारण नाही. असं बघ, हे जुन्या पिढीचं कर्तव्यच आहे.' तो म्हणाला.

'ते कसं ?'–मी.

'ऐक. लग्न झाल्यावर नव्या पति-पत्नीच्या कुटुंबाचा नवा युनिट समाजात सुरू होतो. इतर कुठल्याही युनिटप्रमाणं या युनिटलाही सुरुवातीचं भाडवल हवं असतं. जेवढं शक्य आहे तेवढ्या प्रमाणात, मुलगा व मुलगी या दोघाच्या आई-वडिलांनी, नव्या युनिटला हे भाडवल पुरवावं. त्यात काहीही वावगं नाही.'

'आणि या भाडवलाची परतफेड कशी होणार ?' मी प्रश्नात माझा आक्षेप मांडला.

'या नव्या युनिटस्‌नी नंतर येणाऱ्या नव्या युनिटस्‌ची सोय करायची. त्यांना भाडवल द्यायचं. पिढ्या-पिढ्यांतील परतफेड ही अशीच होत असते. गुरु शिष्याला शिक-

वतो म्हणून काही उलट शिष्य त्याला शिकवीत नाही. तर तो स्वतःच्या शिष्याला शिकवतो.'

मित्राने एकूण या विषयावर बराच विचार केला होता. मी मात्र स्वतःला विचार करणारा आणि त्याला फक्त व्यवहारी समजत होतो. मला थोडी असूया वाटली. त्याचा विचार सहजासहजी कबूल करू नये ही धडपड या असूयेतून.

'पण आताच्या नव्या मुला-मुलींनी जुन्या पिढीची मदत घेऊच नये असं नाही का तुला वाटत ?'

'कोण कुणाची मदत घेत नाही मला साग!' मित्र शातपणे पण आव्हानाच्या भाषेत म्हणाला, 'नव्या संसाराला जागा हवी. ती शोधताना मदत नको ? ती मित्राची घेतली तर ठीक, वडिलाची नि सासऱ्याची घेतली तर बिघडलं, हे कसं काय बुवा ? पैशाचं जाऊ दे. नव्या संसाराला गॅस लागतो. दुधाचं नवं कार्ड लागतं. आणि या सगळ्यासाठी ओळख अन् मदत लागते. मदत कुणाची घ्यायची ? आपल्याच माणसाची ना ?'

'पण इतक्या समजूतदारपणानं कोण वागतंय आज-काल ? हुंड्यापायी मुलींना छळ सोसावा लागतो, जळावं लागतं हे खरं नाही का ? त्याचं काय उत्तर आहे तुझ्यापाशी !' माझा गेल्या सहा-सात दिवसाचा राग मी आता मोकळेपणाने त्याच्यासमोर माडला.

'समजूतदारपणाचा अभाव नाही असं एक तरी क्षेत्र दाखवशील तू मला ?' त्याने शांतपणाने विचारले. आज तो ठरवून शांतपणाची ट्रिक करत होता. मला ते पसंत पडत नव्हते; पण उघड तक्रारही करता येत नव्हती.

'मतदानात गैरप्रकार होतात; परीक्षांत घोटाळे होतात, मुलं आई-वडिलांशी नीट वागत नाहीत. म्हणून काय मतदान, परीक्षा, मुलं—हे सारं बंद करायचं ? हुंड्याचं तसंच आहे. तो बंद करणं कृत्रिम आहे. त्याचं नियमन मात्र करता येईल. ते करायला हवं!'

'नियमन आणखी ते काय करणार ?' –मी.

'आई-वडिलांच्या इस्टेटीत मुलांचा वाटा असतो. इस्टेट वडिलार्जित असेल तर नक्कीच असतो. स्वकष्टार्जित असेल आणि तिचा इतर विनियोग जर केला नसेल तरीही असतो. मुलीचा हा न्याय्य वाटा तिला मिळावा. मुलाचा त्याला मिळावा. मुलाचा हा जो न्याय्य वाटा असेल तो तिच्यासंबधातील हुंड्याची कमाल मर्यादा असे कायद्याने ठरवावे. प्रत्येक लग्नाच्या वेळी ही मर्यादा वेगवेगळी असेल. या कायद्याने हुंडा हा बेकायदेशीर राहणार नाही. म्हणून लपवालपवीही करण्याचे कारण पडणार नाही. इस्टेटीबाबत आयकर अधिकाऱ्याचा दाखला घेऊन हुंड्याची रक्कम ठरविता येईल.' मित्र आपली योजना व्यवस्थित माडत होता. त्यात मी काही बोलणार तोच त्याने मला अडवले.

'गैरप्रकाराचा मुद्दा काढणार असशील तर पुन्हा तो काढू नको ! त्याचं उत्तर मी आताच दिलंय. गैरप्रकार सर्वत्र असतात म्हणून ती ती क्षेत्रेच बंद करायची का ? अहेराची सक्ती होते. अहेर बंद करा. मानपानात फार कडवटपणा येतो. मानपान बद करा. असं करत करत तुम्ही काय सारं जीवन बंद करणार ? मानपान, आहेर यात परस्पर स्नेह व्यक्त करण्याचा हेतू असतो. हा हेतू काही ठिकाणी भ्रष्ट होतो, विफल होतो, हे खरं. पण म्हणून काय मूळ हेतूनं सुरू असलेला साराच व्यवहार बंद करायचा ?'

'पण आज इतकं दारिद्र्य आहे. अशा वेळी संपत्तीचं, थाटाचं असं प्रदर्शन करणं हा गुन्हा नाही का ?' माझा मुद्दा बिनतोड होता.

'असं प्रदर्शन हा गुन्हा आहे, हे उघडच आहे; पण असा गुन्हा आज कुठे होत नाही?' मित्राचा आवाज आता फार कडवट झाला होता. 'सरकारी समारंभ, खाजगी संस्थाचे समारंभ मंत्री-कॉर्पोरेटर याचे दौरे, त्याचे व अधिकाऱ्यांचे पंचतारांकित हॉटेलातील निवास अशा साऱ्या ठिकाणी हे प्रदर्शन आणि ही उधळपट्टी चालूच असते ना ? ही तुलामला बंद करता येणार आहे का ? मग सामान्य माणसांच्या उभ्या आयुष्यात जे साडेपाच चागले प्रसंग येतात ते अनुभवायला तुम्ही का बंदी घालता ?'

मी काही बोललो नाही. मला एक जुना प्रसग आठवला. सहकारी क्षेत्रात मी काम करीत होतो. अननुभवी होतो. अजाण होतो.

एका शेतकऱ्याकडे बरीच थकबाकी राहिली होती. शेतीची सुधारणा काहीच झालेली दिसत नव्हती, 'कर्जाचं काय केलं?' मी विचारल, 'मुलीचं लगीन केलं.' 'अरे, शेती सुधारून बाकी चुकती करायची, की लगीन गाजवून असं कर्जातच बुडायचं ?' तेव्हा तो मला म्हणाला होता– 'शेती काय अन् कर्ज काय, कायमची थोडीच फिटणार आहेत ? आम्ही लहान माणसं. सगळं आयुष्य असंच हालात व कष्टात राहयचं. त्यातनं दोन दिवस गोड खाण्याचे येतात. तेव्हा मात्र सगळं विसरायचं आणि मिरवून घ्यायचं. पुन्हा मग आहेच अनवाणी अनवाणी.'

तो शेतकरी तसे सागत होता, मित्र असा व्यवहार सांगत होता. गतानुगतिकता आणि भावनात्मक सवयीची अगतिकता. त्यांचं सुख-दुःख त्यात होतं. आता तात्त्विक भूमिकेवरून 'खरं सुख आणि खोटं सुख' असा फरक त्याना कसा पटवून देता येईल ?

मी विचार करू लागलो. कारण माझ्यासमोर सकाळच्या 'महाराष्ट्र टाइम्स'मधील (२६ मे) बातमी होती : 'बंगलोर दि, २५ : जबर भाजल्यामुळे रुग्णालयात दाखल केलेली पुष्पा वय २१, काल निधन पावली. पुरेसा हुंडा न मिळाल्यामुळे तिच्या नवऱ्याने व सासरकडच्या माणसानी तिला जाळले होते असे चौकशीअंती समजते.'

पुरुषोत्तम पाटलाचे त्वेषाचे अश्रू मला पुन्हा अस्वस्थ करू लागले.

□


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे
आवृत्ती : दुसरी
किंमत : दहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे

अवती भवती । शरद कृष्णन

# □ बहुगुणा, रवी रे व मुरली मनोहर जोशी

पुढील आठवड्यात उत्तर प्रदेश, ओरिसा, प. बंगाल या राज्यामधील लोकसभेच्या रिकाम्या जागांच्या निवडणुका होत आहेत. त्याचबरोबर उ. प्र. व प. बंगाल येथील विधानसभेच्या रिकाम्या जागाच्या निवडणुकाही होत आहेत. लोकसभेच्या ज्या जागासाठी पोटनिवडणुका होत आहेत त्यापैकी सर्वांत महत्त्वाची पोटनिवडणूक उ. प्र. मध्ये अमेथी येथे होत आहे. पंतप्रधान इंदिराजी याचे थोरले चिरंजीव राजीव गाधी तेथून इंदिरा कॉंग्रेसच्या तिकिटावर ही निवडणूक लढवत आहेत. खेरीज अन्य ठिकाणी होत असलेल्या पोट-निवडणुकीत, माजी केंद्रीय अर्थमंत्री हेमवतीनंदन बहुगुणा, माजी केंद्रीय मंत्री रवी रे, माजी राष्ट्रपती मरहूम फकरुद्दीन अली अहमद यांच्या पत्नी अबीदा अहमद, ओरिसाचे विद्यमान मुख्यमंत्री जे. बी. पटनायक यांच्या पत्नी सौ. जयंती पटनायक यासारखी बडी बडी मंडळी भाग घेत आहेत. पोटनिवडणुकीमधील निकालावरून वारे कोणत्या दिशेने वाहात आहेत हे स्पष्ट होत असल्याने मैदानात उतरलेली सर्व मंडळी आपआपल्या परीने प्रयत्न करत आहेत. राजकीय पक्ष इंदिरा कॉंग्रेसविरुद्ध एकच उमेदवार उभा करू शकतील अशी जी शक्यता प्रारंभी वाटत होती ती न राहिल्याने पश्चिम बंगाल वगळता सर्वसाधारणपणे वातावरण इंदिरा कॉंग्रेसला जास्त अनुकूल आहे.

ओरिसामधील कटक मतदारसंघातून त्या राज्याचे मुख्यमंत्री श्री. जे. बी. पटनायक यांच्या पत्नी सौ. जयंती पटनायक निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या विरुद्धचे प्रमुख उमेदवार आहेत माजी केंद्रीय मंत्री व लोकदलातर्फे निवडणुकीच्या मैदानात उतरलेले रवी रे. ओरिसामधील राज्यसरकारचा अधिकारी वर्ग संपावर गेल्याने मुख्यमंत्री अडकून पडले आहेत. बायकोसाठी त्यांना फारसा वेळ देता येत नाही आणि तरीही आपला पक्ष ही जागा प्रचंड बहुमताने जिंकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. १९८० साली झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी स्वत: जे. बी. पटनायक या मतदारसंघातून एक लाख वीस हजारांचे मताधिक्य घेऊन निवडून आले होते. त्या वेळी त्यानी अरस कॉंग्रेसचे त्रिलोचंद कानुगो याचा पराभव केला होता. या लोकसभा मतदार संघाखाली विधानसभेचे सात मतदारसघ येतात आणि या सातही जागा इंदिरा कॉंग्रेसकडे आहेत. स्वतः मुख्यमंत्र्यांच्या पत्नी निवडणूक लढवत असल्याने त्यांनी ही जागा प्रतिष्ठेची मानली असून प्रचारामध्ये आपला पक्ष कमी पडणार नाही याची दक्षता घेतली आहे. स्वतः मुख्यमंत्री उपलब्ध नसले तरी अनेक मंत्री प्रचाराची जबाबदारी उचलताना दिसत आहेत. सौ. जयंतीबाईंना लोकदलाचे रवी रे यांच्याविरुद्ध लढत द्यावी लागणार आहे. अन्य काही उमेदवार मैदानात आहेत; परंतु सहा राजकीय पक्षांचा पुरस्कार मिळवून मैदानात उतरलेले रवी रे निवडणुक जिंकण्याची शक्यता कमी असली तरी बऱ्यापैकी टक्कर देऊ शकतील असे वाटते. सहा राजकीय पक्षाची पूर्ण ताकद रवी रे याना उपलब्ध झाली असती तर लढत जास्त चागली झाली असती; परंतु त्याचा पुरस्कार करणारे राजकीय पक्ष त्याच्याविरुद्ध आपला उमेदवार उभा करत नाहीत, एवढ्यापुरतेच आपले सहकार्य मर्यादित ठेवत आहेत. उदाहरणार्थ, दोन्ही कम्युनिस्ट पक्षानी त्याची उमेदवारी मान्य केली आहे. तथापि, प्रचाराबाबतचे धोरण ठरविण्यासाठी जी बैठक बोलावण्यात आली होती त्या बैठकीला लोकदलाखेरीज अन्य कोणी उपस्थित नव्हते. लोकदलाचा राज्यामधील सगळ्यात शक्तिशाली नेता म्हणजे बिजू पटनायक. परंतु खुद्द त्याचाच उत्साह बेताचा असून त्यांचा पाठपुरावा करणारी मडळीही फारशी हालचाल करताना दिसत नाहीत. रवी रे आपल्या प्रचारसभामधून राज्यामधील काही मंत्र्यांच्या भ्रष्टाचार प्रकरणावर भर देत आहेत. तसेच वाढत्या महागाईचाही ते वारंवार उल्लेख करत आहेत. पोट-निवडणुकीच्या बाबतीत मतदार सर्वसाधारणपणे उदासीनच असतात. तथापि या वेळी ही उदासीनता जास्त तीव्रतेने जाणवत असल्याने मतदानाचे प्रमाणही बरेच कमी राहील आणि त्याचा लाभही इंदिरा कॉंग्रेसला जास्त मिळून त्याचा उमेदवार निवडून येण्याची शक्यता जास्त आहे.

पोटनिवडणुकीमध्ये सर्वसाधारणपणे पंतप्रधान प्रचारसभेतून भाषणे करत नाहीत. इंदिराजीनीही पोटनिवडणूक दौरा प्रचार-सभांमधून आजवर भाग घेतलेला नाही. तथापि या वेळी त्या उ. प्रदेशचा दौरा करणार असून जेथे पोटनिवडणुका होत आहेत त्या सर्व, पाचही लोकसभा मतदारसंघामध्ये त्या, दौरा करणार असून हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत दोन ठिकाणी त्याची भाषणेही झालेली असतील. उ. प्र. मध्ये पाच लोकसभेच्या जागांबरोबरच विधानसभेच्या वीस जागासाठीही निवडणुका होत आहेत. लोकसभेच्या सर्व जागा जिंकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून असलेल्या इंदिरा कॉंग्रेसला विधानसभेच्या जास्तीत जास्त जागा जिंकण्याची महत्त्वाकांक्षा असून पंतप्रधानाच्या दौऱ्याची आखणी त्याच दृष्टिकोनातून करण्यात येत आहे. उ. प्र. मधील लोकसभेच्या सर्व पोटनिवडणुकातून मातब्बर मंडळी उतरली असली तरी अमेथी आणि गढवाल या दोन जागांबाबत पंतप्रधानांना विशेष गोडी आहे. सर्व विरोधी पक्षानी एकच उमेदवार उभा केला असता तरीही अमेथीमधून राजीव गाधी निवडून आले असते. राजीव गाधी स्वत: प्रचारमोहिमेमध्ये उतरले असून त्याचा प्रचार करण्यासाठी सत्ताधारी पक्षामधील इतकी मंडळी पुढे येत आहेत की, मंत्रीगणाचा हा फौजफाटा आवरायचा कसा, असा प्रश्न राजीवपुढे आहे. आपल्या प्रचारासाठी येणाऱ्या इंदिरा कॉंग्रेसच्या प्रत्येक नेत्याने आपल्याशी पूर्वसंपर्क साधावा, अशी विनंती त्याने केली आहे. गढवालकडे इंदिराजीचे जातीने लक्ष असून बहुगुणा पराभूत झाले पाहिजेत यासाठी त्या स्वतः प्रयत्न करीत आहेत.

गढवालची जागा हेमवतीनंदन बहुगुणा यांनी १९८० साली मोठ्या मताधिक्याने जिंकली होती. त्या वेळी त्यानी ही निवडणूक इंदिरा कॉंग्रेसच्या तिकिटावर लढवली होती. पुढे त्यानी इंदिरा कॉंग्रेस सोडल्यावर आपल्या लोकसभेच्या जागेचाही राजीनामा दिला

होता. पक्षांतर ही बाब सध्या सरसहा पहावयास मिळत असली तरी पक्ष सोडल्यावर पक्षाच्या ताकदीवर मिळवलेले सत्तास्थान सोडण्यास मंडळी नाखूष असतात. अशा परिस्थितीत लोकसभेमधील आपल्या जागेचा राजीनामा देण्याचा बहुगुणा यांचा निर्णय निश्चितपणे स्वागतार्ह मानावा लागेल ! बहुगुणांना पूर्वी जे स्थान होते ते आज राहिले नसले तरी अल्पसंख्य व दलित समाज याना ते जवळचे वाटतात, आपलेसे वाटतात. या निवडणुकीमध्ये ते निश्चितपणे विजयी होतील असा अदाज असला तरी त्याच्या वारंवार पक्षांतर करण्याच्या वृत्तीवर त्यांच्या मतदारसंघामधील मतदार नाराज आहेत. इंदिराजींच्या पक्षात मानाचे स्थान मिळेल अशी बहुगुणांची अपेक्षा होती. त्याना केंद्रीय मंत्रिमंडळामधील महत्त्वाचे खाते हवे होते; पण प्रत्यक्षात त्यांचा समावेशही करण्यात आला नाही. पक्षाचे ते सेक्रेटरी जनरल असले तरी त्यांना कोणी हिंग लावून विचारत नव्हते. विलक्षण कुचबणा झाल्यावर त्यांनी इंदिरा कॉंग्रेस सोडून स्वतःचा पक्ष स्थापन केला. हा पक्ष वाढणे शक्य नसले तरी बहुगुणा यांची पूर्वपुण्याई आणि उ. प्र. मधील त्यांचे विशेष महत्त्वपूर्ण स्थान लक्षात घेता ही निवडणूक जिंकणे त्याना फारसे अवघड जाऊ नये. त्यांच्या निवडणुकीच्या बाबतीत लक्षात घेण्यासारखी एक गोष्ट म्हणजे, ही पोटनिवडणूक त्यांच्या राजकीय भवितव्याची फैसला करणारी आहे. बहुगुणा निवडून आले तरी इंदिरा कॉंग्रेसच्या दृष्टीने काही फारसा फरक पडत नाही; पण यदाकदाचित् ते पराभूत झाले तर मात्र त्यांची राजकीय कारकीर्द संपुष्टात आल्यासारखी असल्याने बहुगुणा जातीने गढवालमध्ये मुक्काम ठोकून आहेत. एकाही विरोधी पक्षाचे त्यांना मनमोकळे सहकार्य नाही. कॉंग्रेस-आयचे सी. एम्. नेगी यांच्यासाठी उ. प्र. चे मुख्यमंत्री वि. प्र. सिंग विशेष प्रयत्न करत आहेत. श्री. नेगी सध्या राज्यमंत्रिमंडळामध्ये राज्यस्तरावरील मंत्री आहेत. उ. प्र मध्ये इंदिरा कॉंग्रेसचे सरकार असल्याने आणि स्वतः 'उमेदवार मत्रिपदी असल्याने पैसा आणि वाहनव्यवस्था या बाबत कशाचीही कमतरता नाही.

बरेली मतदारसंघातून मरहूम फकरुद्दिनअली अहमद यांच्या पत्नीविरुद्ध अरस कॉंग्रेसचे युनुस सलिम निवडणूक लढवत असले तरी या पक्षाची जी वाताहात सुरू झाली आहे त्याचा उदंड त्रास पोटनिवडणुकीत उतरलेल्या या पक्षाच्या सर्व उमेदवारांना होणार आहे. लोकाचा या पक्षावरील उरलासुरला विश्वासही उडाला असल्याने इंदिराभिमुखी अरस कॉंग्रेसच्या उमेदवाराला मत देण्याऐवजी मतदार सरळ इंदिरा कॉंग्रेसला मत देणे पसंत करतील. उत्तर प्रदेशामध्ये बऱ्यापैकी लढत अलाहाबादमध्ये होईल. भाजपचे मुरली मनोहर जोशी ही निवडणूक लढवत आहेत. त्याच्या विरुद्ध राज्यसरकारमधील एक राज्यमत्री के. पी. तिवारी हे निवडणूक लढवत आहेत. भाजपला ही निवडणूक अर्थातच स्वत.च्या ताकदीवरच लढवावी लागणार आहे. कारण उ. प्रदेशात प्रभावी असलेल्या लोकदलाचा अथवा अन्य कोणत्याही महत्त्वाच्या राजकीय पक्षाचा पुरस्कार भाजपला मिळालेला नाही; पण भाजपने आपली पुरी ताकद येथे खर्ची घातली असून ही निवडणूक जिकण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला आहे.

पोटनिवडणुका जेथे होत आहेत अशा प. बंगाल विधानसभेच्या आठ जागावर तेथील मुख्यमंत्र्यानी आपले लक्ष केंद्रीत केले आहे. या जागापैकी जास्तीत जास्त जागा जिंकून जनमत आपल्याच पाठीशी आहे, हे त्यांना सिद्ध करायचे आहे. या पोटनिवडणुकीमध्ये डाव्या कम्युनिस्टानी मोठे यश मिळवल्यास राज्यसरकारची प्रतिमा उजळून निघेल आणि राज्य सरकार उखडू पाहणाऱ्या केंद्र सरकारवर दडपण येईल. या निवडणूक–निकाल-परिणामांची पूर्ण कल्पना असल्यानेच ज्योती बसूनी विधानसभेच्या जागांवर जास्त लक्ष केंद्रित केले आहे. इंदिरा कॉंग्रेसला अनेक ठिकाणी अरस कॉंग्रेसचे सहकार्य लाभले असून विधानसभेच्या जास्तीत जास्त जागा आपल्या पदरात पडल्या पाहिजेत, अशी निवडणूक-मोहीम आखा, अशा सूचना राज्यामधील इंदिरा कॉंग्रेसचे नेते अजितकुमार पंजा यांना केंद्रीय नेत्यांकडून देण्यात आल्या आहेत. अरस कॉंग्रेस बरोबर ज्या अनेक तडजोडी करण्यात आल्या आहेत त्या या निवडणूक डावपेचाचाच एक भाग आहे. अरस कॉंग्रेसची सूत्रे प्रियरंजनदास मुन्शी यांच्या हाती असून इंदिरा कॉंग्रेसला जेथून निवडणूक जिंकणे शक्य आहे अशा बारा ठिकाणी अरस कॉंग्रेसने आपली उमेदवारी मागे घेऊन इंदिरा कॉंग्रेसचा पाठपुरावा केलेला आहे. प. बंगालमधील अरस कॉंग्रेस कोणत्या दिशेने जात आहे, याची कल्पना या निवडणूक धोरणावरून येऊ शकेल. विधानसभेच्या निवडणुकापूर्वी प. बंगालमध्ये नगरपालिकांच्या निवडणुका होत आहेत या निवडणुकांवर डाव्या कम्युनिस्टांनी आपली घट्ट पक्कड ठेवली आहे. हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत त्या निवडणुकांचे निकालही जाहीर झालेले असतील. राज्य सरकारवर अविश्वास असल्याचे निमित्त करून या नगरपालिका-निवडणुकांवर इंदिरा कॉंग्रेसने बहिष्कार घातला असला तरी या बहिष्काराचे खरे कारण अंतर्गत तणाव हेच होते. उमेदवार निवडणे अवघड असल्याने पक्षांतर्गत संघर्ष टाळण्यासाठीच इंदिरा कॉंग्रेसने या निवडणुकीमध्ये भाग घेतला नाही. या उलट राज्यामध्ये सत्तास्थानी असलेल्या डाव्या कम्युनिस्टांनी मात्र पूर्ण ताकदीनिशी या नगरपालिका निवडणुकांमध्ये भाग घेतला. नगरपालिका निवड-

## नंगे

डोक्यास फक्त कळते फर्मान बेरजेचे
टोप्या कितीही बदलू, डोक्यास काय त्याचे ?
नंगे असेच नाचू मिळवून स्वर्गसूख
हसले कुणी कितीही, नंग्यास काय त्याचे ?
ऐकून दु.ख तुमचे करतो जरा दलाली
तुम्ही फसून जाता, भडव्यास काय त्याचे ?
तुमच्या आगीत अमुची पोळी पिकून गेली
तुमच्या हातात झोळी, होळीस काय त्याचे ?
खुर्चीस फिट्ट केले आम्ही विशाल बूड
बाकी बुडीत जावो, आम्हास काय त्याचे ?

—राजा दीक्षित

णुकीमधील एकूण जागांची संख्या होती सुमारे पंधराशे ! त्यापैकी डाव्या कम्युनिस्टांनी ८३४ जागा लढवल्या आणि उरलेल्या जागा मित्र पक्षासाठी सोडून दिल्या. या राज्यामध्ये भाजपला स्थान नसले तरी केवळ आपली ताकद वाढावी या एकमेव उद्देशाने या पक्षाने दोनशे जागा लढवल्या. खेरीज जेथे विधानसभेच्या पोटनिवडणूका होत आहेत त्या जागापैकी जाधवपूर व खरडा या दोन मतदारसंघामध्ये भाजपने आपले उमेदवार उभे केले आहेत. जनता पक्षाला विधानसभा निवडणुकामध्ये महत्त्व नाही आणि नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकामध्येही महत्त्व नव्हतेच. या राज्यात थोडी फार लढत झालीच तर ती डावे कम्युनिस्ट व त्यांचे आघाडीमधील मित्रपक्ष एका बाजूला व इंदिरा आणि अरस कॉंग्रेस एका बाजूला, अशी द्विपक्षीय लढत होईल.

या राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि अरस कॉंग्रेसचे नेते सिद्धार्थ शंकर रे याचो, इंदिरा कॉंग्रेसमध्ये उमेदवारी मिळाली असती तर निवडणूक लढवण्याची इच्छा होती. तथापि त्याच्या नावाची बरीच चर्चा झाली तरी त्याना उमेदवारी मात्र मिळाली नाही. या मतदारसघामधून पन्नासहून जास्त उमेदवारांनी अर्ज भरले होते. तेरा उमेदवारांनी अर्ज मागे घेतले तरी अद्यापि तेहतीस उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या मतदारसंघातून अरस कॉंग्रेसचे बिमल काती घोष निवडणूक लढवत होते. पण प्रदेशाध्यक्ष प्रियरंजनदास मुन्शी याच्या आदेशाप्रमाणे त्यानी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. पाठिंबा अर्थातच इंदिरा कॉंग्रेसला दिलेला आहे. या लोकसभा मतदारसंघामध्ये आता खरी लढत डाव्या कम्युनिस्ट पक्षातर्फे निवडणूक लढवत असलेले अजित बाग व इंदिरा कॉंग्रेसचे उमेदवार शांति मोहन रे याच्यामध्ये आहे. अपक्ष उमेदवारापैकी अमरनाथ चौधरी व एन. जी. महातो हे दोन थोडीफार मते खाऊ शकणारे उमेदवार आहेत.

पोटनिवडणुकांची ही फेरी सत्ताधारी इंदिरा कॉंग्रेसला आव्हान आहे असे नव्हे. विशेषत: सर्व प्रमुख विरोधी पक्षाची अवस्था केविलवाणी असल्याने इंदिरा कॉंग्रेसचे काम सोपे झाले आहे. असे असले तरी बहुगुणा, रवी रे, मुरली मनोहर जोशी यासारखे विरोधी पक्षाचे उमेदवार कितपत यश मिळवतात याकडे थोडे-फार लक्ष जरूर आहे.

## □ वृद्धाश्रम : एक काळाची गरज !

वाढत्या महागाईमुळे मिळवते हात इतके त्रस्त झाले आहेत की, स्वत.च्या आई-वडिलांचे आणि पालनकर्त्यांचेही त्याना ओझे वाटू लागले आहे. या वृद्ध मंडळीनी स्वत.ची आर्थिक सोय करून ठेवली असली तर जरा तरी ठीक; परंतु ती जर नसेल तर मात्र या मंडळीचे हाल कुत्रा खात नाही, अशी परिस्थिती आहे. ज्याची आर्थिक तरतूद आहे अशी मडळीही आपल्या मुलाबाळामध्ये मोठघा सुखात आहेत अशातला भाग नाही. बहुसंख्य ठिकाणी केवळ नाइलाज म्हणूनच त्यांचा सांभाळ केला जात आहे. वृद्धाश्रम ही आता काळाची गरज ठरली आहे. सर्वसाधारणपणे वृद्धाना अखेरच्या दिवसात आपल्या मुलाबाळांत राहणे आवडत असले तरी कौटुंबिक वातावरण जर निकोप नसेल आणि वृद्ध मंडळीचे मुलांबरोबर जर वारंवार खटके उडत असतील तर या एकत्र राहण्याला तसा अर्थ नसतो. स्वतंत्रपणे राहायचे ठरवले तर वयाबरोबर येणाऱ्या वाढत्या परावलंबित्वामुळे ते शक्य नसते. खेरीज, तेवढी आर्थिक ताकदही नसते आणि स्वतंत्रपणे राहायला जागाही नसते. मग करायचे काय ? असा प्रश्न उभा करून 'वीकएन्ड' या साप्ताहिकाने त्यावर तोडगा म्हणून वृद्धाश्रमाचा उपाय सुचवला आहे. हा उपाय तसा थोडा-फार क्लेशदायक असला तरी दोन्ही बाजूना सोयिस्कर आहे. घरी राहणाऱ्या वृद्धमडळीपेक्षा वृद्धाश्रमामध्ये राहणाऱ्या मडळीचे आपल्या कुटुंबियांबरोबर जास्त चागले सबंध आहेत, असे त्यानी केलेल्या पाहणीमध्ये आढळून आले आहे. देशामध्ये चोवीस प्रमुख वृद्धाश्रम असल्याची माहिती त्यानी दिली असून सगळ्यात मोठा वृद्धाश्रम अलाहाबाद येथे आहे. एका सामाजिक संस्थेतर्फे चालवल्या जात असलेल्या या वृद्धाश्रमामधील प्रत्येक गरजू वृद्धाला राज्य-सरकारतर्फे तीस रुपयाची मदत देण्यात येते. तसेच त्याच्या औषधोपचाराचीही व्यवस्था करण्यात येते.

वृद्धाश्रमामधील मंडळीबरोबर बातचीत केली असता त्यातील बहुसख्य मंडळी निराश झालेली दिसतात. आपण ज्याच्यासाठी आयुष्य खर्ची घातले त्याना आपली विशेष पर्वा नाही, याची त्याना खंत वाटते. मात्र असे असले तरी ज्याची मुलाखत घेण्यात आली अशा आठ व्यक्तींपैकी पाच मंडळीनी आपले उर्वरित आयुष्य येथे घालवणे जास्त सुखदायी असल्याचे बोलून दाखवले. सरकारी सेवेत हयात घालवलेले राम किशोर अग्रवाल म्हणतात : मला दोन मुले आहेत. त्यांच्या शिक्षणावर मी सारी कमाई खर्च केली. मला परवडण्यासारखे नसूनही एकाला इंजिनिअर केला; पण तरीही त्याच्याजवळ राहणे फारसे सुखावह ठरले नाही. बारीकसारीक गोष्टीवरून कटकटी होऊ लागल्या. तेव्हा मी होऊनच 'एल्डर्स होम' या वृद्धाश्रमात दाखल झालो आणि गमत म्हणजे मी घर खरंच सोडल्यावर मुलांना माझ्याबद्दल ममत्व वाटू लागलं. घरी मला वरखर्चासाठी पचवीस रुपयेही मिळू शकत नसत, पण आता माझ्या पेन्शनची १३० रुपयांची रक्कम तर माझ्याकडे येतेच, शिवाय माझी दोन्ही मुलं आश्रमाचे १०० रुपये भरून वर मला प्रत्येकी पंचवीस रुपये देतात. सणावारी आठवणीनं गोडधोड पाठवतात, पुष्कळ झालं. मात्र आश्रमातील महिला विभागामध्ये राहणाऱ्या अंजना वास्वानी म्हणतात : फाळणीनंतर आम्ही हिंदुस्थानात आलो. जे काही किडुक मिडुक आणल होतं ते विकून नवऱ्यानं मुंबईत जनरल स्टोअर्स सुरू केलं. व्यवसायात जम बसला. आम्हाला एक मुलगी होती. तिला हौसेनं शिक्षण दिलं ती मुंबईत शिक्षिका आहे. जावई दुकान चालवतो. जावयाचे वडील त्याच्याजवळ राहतात; पण मी त्याच्याकडे राहणं त्याला पसंत नाही. नवरा-बायकोमध्ये भाडण नको म्हणून मी होऊनच घराबाहेर पडले खरी; पण इथे मी समाधानी नाही. आश्रमात आणखी चार बायका आहेत. त्याच्यापैकीही कोणी समाधानी नाही. मी मुलीच्या पत्राची वाट बघत बसते. नशीब एवढंच की, ती दरमहा एक पत्र आणि आश्रमाच्या पैशाखेरीज ४० रुपये पाठवते. एकदा नातवाला घेऊन भेटायला आली होती; पण तेवढ्यानं समाधान होत नाही. मुलीजवळ जावंसं वाटतं. केवळ इलाज नाही म्हणून इथे राहते. ज्यांनी आपले आप्त वृद्धाश्रमात ठेवले आहेत अशा मंडळीना तुम्हाला म्हातारपणी वृद्धाश्रमात राहणं आवडेल का, असा प्रश्न विचारला असता ८ मंडळीपैकी ६ जणांनी 'मुळीच नाही' असं उत्तर दिलं, तर दोघीनी, 'आम्ही मानसिक तयारी ठेवली आहे. कारण वृद्धाश्रम ही काळाची गरज आहे' असं उत्तर दिलं. □

## निपाणीच्या तंबाखू-उत्पादक शेतकऱ्याला दलालांच्या पिळवणुकीतून मुक्तता हवी होती.

# तंबाखट

लेखक : विजय परुळकर । लेखांक : पाचवा

सामानाची आवराआवर करून मी पुण्याला परतायच्या तयारीला लागलो. तंबाखू खरेदी-विक्री सहकारी संघ स्थापन करणारे एस. टी. चौगुले बाहेरगावी गेले होते. त्यांची भेट घेणं आवश्यक होतं; पण माझा नाइलाज झाला होता. विडीकामगार-नेत्या आयेशा-शान-ए-दिवान ऊर्फ चाची ह्यांच्याशीदेखील बातचीत करायची होती; पण त्यांचा अजून पत्ता नव्हता ! कॅमेरे, टेपरेकॉर्डर वगैरे बॅगमध्ये व्यवस्थित बंद करत असतानाच सरांच्या घराच्या दरवाज्यासमोर मलिक-ए-मैदान तोफ डागल्याचा भास झाला. 'चाची' आल्या होत्या. दरवाजात उभ्या राहून त्या एका कार्यकर्त्याला विचारत होत्या-.

'मुझे कायकू बुलाया तुमने ? उधर मेरा क्यत्ता काम पडा है सो-तुमे एक उद्योग नहीं. हमे भी वैसेच करको समझते क्या ? कौन उनो पुनावाला आया है बताव तो मुझे-उसको भी मैं पुछती-काम नहीं क्या करको ! बात्या करने को बुलातैं-बात्या करके क्या फायदा ? कहां है वो-पुनावाला ?'

बाहेरचा गडगडाट ऐकून माझी तर हवाच जाम झाली ! ह्या बाईबरोबर कशी काय बातचीत करायची ? ही तर आपल्याला कच्चा खाईल ! माझा पडेल चेहरा बघून सरांना हसू आवरेना. 'तोफखाना आला !' म्हणत सुनीताअक्का चहा ठेवण्यासाठी स्वयंपाकघरात गेल्या आणि सर म्हणाले, 'अहो, चाची ! रस्त्यावर आरडाओरडा नको ! आत या, पाव्हणे आलेत तुमच्याशी बोलायला !'

नऊवारी पातळ परिधान केलेली मर्दानी 'चाची' आत आली तेव्हा सटपटून उभा राहिलो आणि हात जोडून त्यांना नमस्कार केला. माझा अवतार बघून चाचीला हसू फुटलं. तोंडावर पदर धरून हसू लपवीत त्या म्हणाल्या-'अय्यो, तुमे कायकू खडे होके नमस्कार करतैं पुढारी जैसा. उनो व्होट मांगने के टायमकू ऐसाच नमस्कार करतैं. तुमें आरामशीर बैठो-और क्या पूछनेका है ओ जल्दीसे पूछो-मेरा काम पडा है !'

घसा खाकरून मी बोलायची तयारी केली आणि मनातल्या मनात प्रश्नांची जुळवाजुळव करू लागलो; पण प्रश्न कुठल्या भाषेत विचारायचा ? बेळगावी मराठीत की हैद्राबादी हिंदीत ?-काय होईल ते पहाता येईल म्हणून शुद्ध मराठीतच सवाल केला-'चाची, मागच्या दिवाळीच्या सुमारास, नोव्हेंबर महिन्यात तुम्ही निपाणीत संप केलात तेव्हा पोलिसांनी तुम्हाला बेदम मारलं असं कळलं. तेव्हा प्रकार काय घडला ते जरा सांगाल तर बरं-'

'प्रकार क्या घडनेका'-पदर खोवत चाची सांगू लागल्या-'हमेशा घडतंय वैसाच प्रकार-उस दिन पोलिस लोगां डरे और ये इत्ते इत्ते नळकांडे-हाऊंच करनेका के फोडनेका, हाऊंच करनेका के फोडनेका-'

चाचींचं हैद्राबादी हिंदी विकेट घेणारं होतं. त्या काय सांगताहेत तेच कळेना तेव्हा मी बिचकत म्हणालो-'चाची, तुम्हाला मराठी येत असेल तर ...'

'न यायला काय झालं'-चाची ताडकन म्हणाल्या, 'म्हराटी न यायला काय धाड झाली-माझी भाषा मराठीच हाय-'

'मग कृपा करून मराठीत सांगा ना-तुमचं ते हाऊंच करनेका के फोडनेका म्हणजे काय तेच मला कळेना झालंय !-' माझी अडचण ध्यानात येताच चाची एखाद्या लहान मुलीप्रमाणे लाजून हसल्या आणि म्हणाल्या-

'अश्रुधूर हो ! अश्रुधूर-हेऽऽ नळकांडे फोडायचे. बायकांची दानादान उडाली ! त्या वेळेला मी एकटीच गाठ पडलो त्यास्नी. पोलिसास्नी मी काय म्हटलो-मी काय दंगाधुडपुस करायला आलो नाही. तोडातोडी करायला आलो नाही. ही म्हातारी इथं पडलीया तिला पानी द्यायला लागलोय; पण पोलिसांनी काही ऐकलं नाहीच. असं दोन्ही रट्टयात हात घालून मला ओढत नेलं. मी म्हटलो-असं ओढता का ?'

'चाची, तुम्हाला महिला पोलिसांनी धरलं की पुरुष पोलिसांनी-' मी सवाल केला. चाची चिडून कडाडल्या-

'अहो, दोघी पोलिस बाया हुत्या; पण त्या कुठं कोन्यात जाऊन बसल्या की ! नुसतं पुरुष पोलिसच हुतं. त्यांनीच दणकलं मला धरून !'

'इथला निपाणीच एक पोलीस हाय. त्याला मी परवा म्हटलो-

असा टरक्या डोळघानं बघू नको. ह्याय तो डोळा बी फुटल ! मी म्हटलो–तुम्ही पोलीस असला तरी माणसंच आहासा. तुम्हाला एक चारजणास्नी कामावरून कमी करू दे बघू ! मग तुम्ही पण संप कराल–कराल का न्हाई ?

'टाईम न्हाई त्या टायमाला आम्हा बाया मानसास्नी तुम्ही पोलीसकचेरीत बोलवता–कशासाठी ? ही काय कचेरी का हजामपट्टी! ह्यांनी बोलवलं की सारखं जाऊन त्या कचेरीत उभं न्हायचं–कशासाठी ? सारखं बोलविव्यात ! ही केस, ती केस–सारखं उठून केसिस घालतात आमच्यावर ! चॅप्टर केसा घालायला आम्ही काय गावात गुडगिरी करतो काय ? गुंडगिरी पुरुष करतात का बाया ? –पण आमच्यावर चॅप्टर केस ! आता उद्यापासून कात्र्या घेऊन खिसे कातरत फिरायला पाहिजे आम्ही !'

'मला एक सागा चाची–' मी प्रश्न केला. 'पोलिसांनी तुम्हाला कशासाठी मारलं ? असं तुम्ही काय मागत होता – सोन्याची कौलं ?'

डोळघातून अंगार सांडत चाची म्हणाली–'आम्ही काही मागत नव्हतो. आमचं विडीचं पान मालकांनी कमी केलं होतं ते आम्ही वाढवून मागत होतं. पान कमी म्हंजे विड्या कमी–आमची मजुरी कमी. म्हणून मालकाला आम्ही काय म्हटलो, नवीन पानं आल्यात तर आम्हाला दोनशे ग्रॅम पान वाढवून द्या ! तो ऐकेना. पोलिसास्नी आम्ही काय म्हणालो, आम्ही काय कचेरीत येत नाही. तुम्हीच मालकाला आणून आमच्यासमोर उभं करा ! आम्ही काय दंगा करणार नाही. मालकाला आम्ही फक्त एक-दोन गोष्टी विचारणार. एव्हढं साधं आम्ही सांगत असताना आमच्यावर अश्रुधूर सोडला आणि काठीनं मारलं ! माझ्यावर तर ह्या मालकाचा आणि पोलिसांचा दातच होता. ते म्हणायचे, ही बाई लयी बोलते. हिला एकदा धरून बडविलीच पायजे !

'मी तुमास्नी खरं काय ते सांगते. दोन पोलीस रोज कारखान्यात येऊन बसायचे. मालक स्वतःच्या रखवालीसाठी ह्या पोलिसांना बसवायचा. एकदा एक पोलीस उठून एका तरण्या पोरीजवळ येऊन म्हणाला–'अग, अग कशाला नाचतीस ?' मी त्या पोलिसाला विचारलं, 'तुझी बायको तुझ्या ताब्यात आहे काय ? मग दुसऱ्यांच्या मुलीना तू अगं अगं का म्हणतोस ? सरळ बोलायला येत नाही तुला ?' मी पायातली चप्पल काढूनच त्या पोलिसाला तंबी दिली. म्हटलं, 'पहिल्यांदा तुमच्या स्वतःच्या बायकाना सुधारा आणि मग दुसऱ्याच्या बायकाना शहाणपण शिकवायला या !

'त्या पोलिसानं मग कचेरीत जाऊन फौजदाराकडे चुगली केली मी दम दिला, त्या दिवसापासूनच पोलिसानी ठरवलं असणार की कधी तरी ह्या बाईला धरून बडवायचं !{

'आम्ही काय लाडीलबाडी केली नाही, कुणाचा माल चोरला नाही, का घर लुटलं नाही. आम्ही फक्त आमचं विडीचं पानं वाढवून मागितला. बाजारात पानं कमी होतं तेव्हा आम्ही गप्प होतो; पण नवीन पान आलं म्हणून समजल्यावर आम्ही कमी केलेलं वाढवून मागितलं. आम्ही दोनशे ग्रॅम पान वाढवून मागितलं काय आणि लगेच लंकेला विस्तो लागला काय ! मालक नुसता गरम होऊन टंगू टंगू नाचायला लागला ! ह्या सांबर – विडीचा मालक असा विचित्रच आहे. ह्या सांबरवाल्यानंच निपाणीत निखारा टाकला !'

चाची श्वास घेण्यासाठी थांबल्या तेव्हा संधी साधून मी म्हणालो, 'मालकाला असं वाटायला लागलं का आता कामगार बायका बोलायला लागल्या. पूर्वी मुकाट्यानं सांगितलेलं ऐकत, आता उलट उत्तर द्यायला लागल्या. रस्त्यावर येऊन शिव्या द्यायला लागल्या. म्हणून मालक चिडला असणार ! सुभाष जोशीनं कामगार बायकांना शहाणं केलं, त्या जास्त जोर करायला लागल्यात तर त्याना एकदा हिसका दाखवू या. असंच मालकाचं म्हणणं असणार ना ?'

'असंच हो असंच वाटतंय त्याला. चाची हेटाळणीच्या स्वरात म्हणाल्या, 'आम्ही पानं वाढवून मागितलं हे नुसतं निमित्त ! हे मालकलोक रोज दहा रुपये पगार द्यायलापण तयार होतात; पण केव्हा ? 'ए बाई, तू जरा टाइम सोडून वेगळ्या टायमाला माडीवर ये !' तसं केलं तर वाटेल तितका पगार द्यायला ह्यांची तयारी आहे! पण आता ते सगळं बंद झालंय. तसलं काही आता चालत नाही. आम्ही म्हणतो आम्हाला काम पाहिजे आणि कामाप्रमाणे दाम पाहिजे !

'ह्या सांबर विडीवाल्याचा माझ्यावर पहिल्यापासूनच फार राग. सुरुवातीला त्याच्या कारखान्यातील बऱ्याच बायका त्याच्या बाजूनं होत्या. मी त्या सगळ्या कामगार–बायांना पटवलं आणि युनियनमध्ये आणलं. तेव्हापासून सांबरवाला चिडला. मी काय म्हणायची, आज आईदेखत लेक माडीवर जाते, सासूरवाशी सून जाते, नवऱ्याची बायको जाते ! निपाणीतील हे मालकलोक फार विचित्र ! म्हणून ह्या सगळ्या कामगारबायाना मी युनियनमध्ये सामील करून घेतलं आणि हे 'जाणं' बंद करून टाकलं ! बायकाना मी स्पष्ट सुनावलं, आपण काम करतो, पोटासाठी कामाची मजुरी मागतो, तेव्हा हे असले धंदे करून मालकाचे पाय धरायची जरूर नाही ! युनियनमध्ये यायचं, हक्कानं काम मागून घ्यायचं, हक्कानं पगार मागून घ्यायचा !

'मालक तेव्हा कामगार बायकांना फितवायचा प्रयत्न करून म्हणायला लागला 'ही बाई वांड आहे, तिच्या नादाला तुम्ही लागू नका, मी तिला कारखान्यातून काढून टाकणार आहे !' मी काय म्हणायची, बायानो, आपण एक झालो तरच हे काम होणार, तरच मालक वठणीवर येणार !

'मग मालकानं काय केलं, तर माझ्या घरावर एक मोर्चा नेला. त्याचा विचार असणार की, एकदा माझ्याच घरावर मोर्चा नेऊन थोडा दंगा केला की मग इतर कामगारबाया आपोआपच थंड होणार ! त्यानं दीनशे माणसाचा मोर्चा माझ्या दारात आणला. तरण्या मुलीना रस्त्यावर ओढायचं आणि दंगा–धुडगुस घालायचा असा त्याचा डाव ! आणि त्यानं आपला डाव पार पाडला ! माझ्या घरावर दगडफेक केली, माझ्या घराचे उंबरे पहारीनं उखडून काढले, दार मोडून माझ्या तरण्या मुलीना रस्त्यावर ओढून मारहाण केली !

'मी त्या वेळी कारखान्यात होते. कानावर ही बातमी आली तेव्हा माझ्या बाजूच्या बाया म्हणाल्या, 'तु इथच थांब ! तिथं गेलीस तर आणखी जास्तच दंगा होणार !' मी बसून राहिले आणि काही कामगारबाया माझ्या घराकडे काय प्रकार चाललाय म्हणून पहायला गेल्या.

'तोपर्यंत मोर्च्यातले लोक कारखान्यावर आले. माझ्या पोराला माझ्यादेखत त्यांनी तुडवून मारलं. तुझा खून करायला आम्हाला मालकानी पैसे दिलेत म्हणाले. तुझ्या पोराचा पण खून करू म्हणाले.

'दंगा ओसरल्यावर मी माझ्या पोराला घेऊन कचेरीत गेले; पण तिथं कुणीच आमची दाद घेईना. माझ्या तरण्या पोरीना घरातून रस्त्यावर ओढून मारहाण केली त्याची दाद कुणी घेईना! कचेरीतील टेबलावर दोन्ही हात दणादण आपटून मी मनगटातील सगळी काकणं रिकामी केली; पण कुणीच चौकशी करायला तयार नाही! माझ्या दोन तरण्या पोरीचा इस्कोट व्हायची वेळ आली तेव्हा तुमचा कायदा कुठं गेला म्हणून मी फौजदाराला विचारलं. आम्ही असा प्रश्न विचारावा का नको?'

त्या प्रसंगाच्या आठवणीनं चाचीचा संताप उफाळून आला होता. डोळ्यात नुसती आग होती आग. मी हलकेच विचारलं, 'चाची, हे दंगा करणारे, मोर्चा काढून मारणारे लोक कोण होते?'

कपाळावरचा घाम पुसत चाची तुच्छेतेनं म्हणाली.' 'मालकाचेच लोक हो! इकडचे निपाणीचेच! आम्ही नुसतं पान वाढवून मागितलं तर काल आठ जणीवर केस, दहा जणीवर केस, उद्या सोळा जणीवर केस! पण आमच्या घराचे उंबरे उस्कटून दंगा करणाऱ्यावर केस नाही!'

चाचीच्या पोटातील आग बाहेर पडावी म्हणून मुद्दामच डिवचण्याच्या हेतूनं मी म्हणालो, 'चाची, मला तर वाटतंय की इकडचे मालक म्हणत असणार, सुभाष जोशीमुळेच हा सगळा गोंधळ चाललाय! पूर्वी कसं सगळं व्यवस्थित होतं. कामगारबायका सोळा-अठरा तास काम करत होत्या. कधी तोंड वर करून उलट बोलत नव्हत्या. मिळेल ती मजुरी आनंदानं घेत होत्या; पण ह्या सुभाष जोशीनं सगळा गोंधळ करून ठेवला! ह्यानं विडीकामगार-स्त्रिया, तंबाखू कामगार-स्त्रिया ह्यांची युनियन वगैरे काढून नसता उपद्व्याप सुरू केला, बायकाना भलतंच काही तरी शिकवायला सुरुवात केली!'

'त्यानी काय भलतंच शिकवलं?' माझ्याकड जळजळीत दृष्टी टाकून चाची फणकाऱ्यानं म्हणाल्या, 'त्यांनी शिकवलं म्हणून ऐकायला आम्ही काय वेड्या आहोत? आमचे 'सर' म्हणाले, बायानो, तुम्ही असं ह्या मार्गानं जा!' त्यानी फक्त रस्ता दाखवला, चालायचं काम आम्हीच केलं. आमच्या पोटासाठी सुभाष जोशी, आमचे सर आम्हाला रस्ता दाखवायला आले, त्याप्रमाणे आम्ही आमच्या मागण्या मागायला लागलो, ह्यात काय चुकलं? सुभाष जोशीनं कुणाचं काही वाईट केलं नाही. सुभाष जोशीनं कुणाचं नुकसान केलं नाही!'

'पण त्याच्यामुळं मालकाचं नुकसान व्हायला लागलं त्याचं काय?' मी मुद्दामच आगीत तेल टाकलं. अपेक्षेप्रमाणे भडका उडालाच! चाची खवळून म्हणाल्या,

'आणि मालकानं इतकी वर्षं आम्हाला लुबाडलं, आमचं नुकसान केलं त्याचं काय? ते कोण भरून देणार? तुम्ही देणार?—पाच पाच महिने कामधंदा नसल्यामुळं आम्ही पोराबाळाना घेऊन बिन अन्नाचे काढले त्याचं काय? कुणाला सांगायचं हे सगळं? फक्त भाताची गंजीपाणी करून आम्ही आमच्या मुलाबाळाना जगवतोय ह्याची कुणाला दखल आहे का?—आणि सुभाष जोशी आमच्या बाजूला उभा राहून आम्हाला मदत करायला लागला तर हे सगळे मालक त्याच्या विरुद्ध उठले! अहो, सुभाष जोशीनं कुणाचं वाईट केलं नाही—इकडचे मालकलोकच हलकट आहेत!

'आम्ही पगारवाढ मागितली तेव्हा मालकानी लगेच आमची पानं कमी केली. पूर्वी पानं होती आणि आताच एकदम नाहीत, हे कसं काय? पण मालकलोक असं करणार हे सरांनी आम्हाला अगोदरच सांगितलं होतं. तसंच झालं! आता आजूबाजूच्या गावात, खेड्यात ह्या मालकांनी कारखाने काढून कमी पगारावर बायका नेमल्या. तिथं देण्यासाठी मात्र भरपूर पानं आहेत! मग ती पानं कुठनं आली? मालकाच्या दारात बसून आता आम्ही हे विचारावं का नको?'

'पण असा हा संप, हा मालकाबरोबरचा लढा तुम्ही किती दिवस चालवणार?'

'जोपर्यंत हे मालकलोक नीट वागत नाहीत तोपर्यंत हे असंच चालू राहणार. ते तरी किती दिवस टिकतात बघू या की!'

'आणि पकडून तुम्हाला तुरुंगात घातलं तर?'

'घालू देत की! आता बेड्या चढवू द्या! दहा बेड्या चढवू देत मनगटात! एक पोलीस एकदा मला म्हणाला—बाई, तुमच्या मनगटात तर बेड्या असतातच! मी म्हटलं, त्या पैसे देऊन चढवलेल्या असतात. तुमच्या फुकटच्या बेड्या अजून चढवलेल्या नाहीत. असेल हिंमत तर त्या चढवा!'

'आणि वर्षभर नेऊन ठेवलं तुरुंगात तर?'

'ठेवीनात! दहा वर्षं ठेवीनात—फुकटचं गिळायला तरी मिळेल. आराम दोन वेळा खात बसायचं! मग ही इकडची फुकटची झाडाझडती पाहिजे कुणाला? मी आता तयार आहे तुरुंगात जायला!'

'—पण तुरुंगात गेलं तर अब्रू जाणार नाही?'

'अब्रू कशासाठी जाते? एक कुठला तरी वाईट धंदा केला तर अब्रू जाते! आता मी मुसलमान आहे. आमचे मुसलमान लोक मला म्हणायला लागले, आपल्या जातीत असं वागलेलं चालतंय काय? तू असं करायला लागलीस हे बरं दिसतंय का? मी त्याना म्हटलं, तुम्ही खानदान घराण्याचे असाल, उच्च घराण्याचे असाल, तुम्हाला 'पडदा' आहे, तुम्ही आत पडद्यात बसून राहा! आम्हाला मारून-मुटकून मुसलमान केलेलं आहे. आम्ही पोटासाठी सडकेवर येणार! मला उपदेश करणारे गप्पच झाले. माझं बोलणं हे असं आहे. पोटासाठी भांडून जर आम्ही तुरुंगात गेलो तर अब्रू कशाला जाते? मला दहा वेळेला नेऊन तुरुंगात घालू देत, दर खेपेला मी शड्डू मारत बाहेर येणार! कोण माझी अब्रू काढतंय बघू या! अजूनपर्यंत कुणाची हिंमत झाली नाही!'

'चाची, आतापर्यंत पोलिसानी फक्त अश्रुधूर सोडला, लाठीमार

## ' फक्त भाताची गंजी-पाणी करून आम्ही आमच्या मुलाबाळांना जगवतोय ! '

केला ; पण तुम्ही असंच आंदोलन चालू ठेवलंत आणि मग एक दिवस पोलिसांनी गोळीबार केला तर ?'

'शिरेल गोळी ! —अमक्या कारणासाठी बाई मेली ! लोक नाव तरी घेतील ! दोन गोळ्या झाडायच्या तिथं दहा घालू द्यात. माझ्या पाठीमागनं सगळी पंगत येईल !'

'चाची, हे सुभाष जोशी तुम्हाला जे सांगतात ते सगळं तुम्हाला पटतंय ? त्यांनी सांगितलेलं सगळं बरोबर कशावरून ?'

'आमचे सर सांगतात ते बरोबरच असतंय ! आतापर्यंत त्यांनी जे जे होणार म्हणून सांगितलं तेच होत गेलं. आम्ही पहिला संप केला, आंदोलन केलं तेव्हा मालकानं पगारवाढ दिली; पण सर म्हणाले, मालक आता तुमचं पान कमी करणार ! आणि तसंच झालं ! सर म्हणाले, पान वाढवून मागा आणि मालक कसा वागतोय बघा ! आम्ही पान वाढवून मागितलं आणि मालक टण् टण् नाचायलाच लागला ! सरानाच शिव्या द्यायला लागला. आम्हाला काय वाटेल ते बोलायला लागला—म्हणाला, 'सुभाष जोशीच्या नादानं तुम्ही बाया रस्त्यावर येऊन डान्स करायला लागलात !' आम्ही मालकाला म्हटलं, तुझी बायको डान्स करते म्हणून आम्ही पण डान्स करायला लागलो. तो चिडून म्हणाला, तुम्ही फार नाचायला लागला ! आम्ही म्हटलं, मालकाची बायको नाचते म्हणून कामगार बाया नाचतात !—आता तो बोलला की, आम्ही लगेचच जबाब देतो. मालक शिव्या देतो—उंडग्या रंडे, हडसू मगनं, कानडीत काय वाटेल तसल्या घाणेरड्या शिव्या देतो. आम्ही पण त्याला शिव्या देतो ! आम्ही रांडा तर तुझी बायको सात रांड !—सांगायचा मुद्दा काय, तर सुभाष जोशीनं आम्हाला जेव्हा जेव्हा काही सांगितलं ते महत्त्वाचं होतं—कारण मालक लगेच नाचायलाच लागायचा !'

'चाची, तुम्हाला एवढं धैर्य कुठून आलं ?'

'मी पहिल्यापासून अशीच. पहिल्यापासूनच धीट. मला कशाचीच भीती वाटत नाही. बंदुकीची गोळी घातली तर आरामात लांबसडक होऊन पडीन ! मला त्याचं काही वाटत नाही. मालकलोक तर वाटच बघत बसलेत, सुभाष जोशी आणि ही एक बाई केव्हा मरेल म्हणून ! पण आम्ही मरतच नाही. ते शिव्या घालतात तितकं आमचं आयुष्य वाढतच चाललंय ! माझी सासू नेहमी म्हणायची, ही मेली तर दहा सुना आणते ! पण मी काय मेले नाही, माझी सासूच मरून गेली. मी अजून जिवंतच आहे आणि माझा 'सर' तर चांगलाच आहे. त्याला काहीच होणार नाही.'

'समजा, हे सुभाष जोशी किंवा त्यांच्यासारखा विचाराचा माणूस निपाणीत आलाच नसता—हा 'सर' तुम्हाला भेटलाच नसता तर काय झालं असतं ?'

'कामगार बायकांची हालत अतिशय वाईट झाली असती. आम्ही असं फुकटचं राबतच मरून गेलो असतो. आमच्यावर सतत अन्याय चालू होते. सुभाष जोशी भेटेपर्यंत आमची स्थिती, आई नाही आणि बाप पण नाही अशी होती. आमचे 'सर' देवानंच आमच्यासाठी पाठवले असं आम्ही मानतो. आमच्या आई-बापावर नाही, नवऱ्यावर नाही इतका त्यांच्यावर आमचा विश्वास आहे. त्यांनी आगीत उडी मार म्हणून सांगितलं तरी आम्ही मारणार !'

'आता समजा, व्यापाऱ्यांनी आणि मालकानी ठरवलं की चाची आता लीडर झाली, युनियनमधल्या बायका सुभाष जोशीचं ऐकतात तसं चाचीचंदेखील ऐकतात ! तेव्हा चाचीला पैसे देऊन दुसरी युनियन काढायला सांगू ! ही युनियन फोडू !'

'अहो, हे सगळे प्रयत्न मालकानी करून झाले! मालकांच्या दिवाणजीनं एके दिवशी मला बोलवून घेतलं. तीन मजल्याच्या माडीवर नेलं. एका पाठीमागच्या खोलीत बसवून माझ्यासमोर तीन हजार रुपयांचं बंडल ठेवून म्हणाले—चाची, तू युनियन सोड ! आम्ही तुला आणखी पैसे देतो ! मी काय विचार केला, आज मालक तीन हजार रुपये देतोय, ही बांधलेली भाकरी ! चार भाकरीच्या ठिकाणी सहा आहेत. दोन दिवस पुरतील, तीन दिवस पुरतील—मग चौथ्या दिवशी कुणाच्या दाराला जायचं ? लोक म्हणणार, पैसे घेऊन बसलीस आता त्यांच्याकडेच जा भीक मागायला ! अहो, असली बांधलेली भाकरी फार दिवस पुरवटी पडत नाही !—मी तीन हजार रुपयांचं बंडल बाजूला सारलं आणि म्हटलं, 'असं शेण खाणारी मी बाई नव्हे ! तिनाच्या ठिकाणी दहा हजार दिलेत तरी ते तुडवून जाणार ! आमच्या सरांनी सांगितलेलंच ऐकणार !

'—साबरवाल्याला वाटलं की ही बाई मुसलमान आहे. मुसलमानाच्या जातीमध्ये युनियनमध्ये गेलेलं चालत नाही—कारण हे मुसलमान स्वतःला खानदान घराण्याचे समजतात ! सांबरवाल्याला वाटलं हिला पैसे दिले, जातीकडून भीती दाखविली तर ही सुभाष जोशीच्या युनियनमधून बाहेर पडेल ! मी मालकाला स्पष्ट सांगितलं, 'मी एकटीच मुसलमान नाही. दहा हजार बायकांच्या युनियनमध्ये पाच हजार बाया मुसलमानाच्या आहेत. कुणाकुणाच्या भाकरीची सोय करता सांगा!' तो म्हणायला लागला, 'मुसलमानाची अब्रू जाते !' मी म्हटलं, 'कशानं अब्रू जाते ? कुणाबरोबर पळून गेले नाही, कुणाला ओढून आणलं नाही—मग अब्रू कशाची जाते ? आज मुसलमानांच्या जातीत बहिणीला धंद्याला लावतात ते चालतंय ? स्वतः एव्हढी लांब दाढी राखून राडंमुडं घरात बसून रहातात—मग अब्रू कुणाची आणि कशासाठी जाते ?—आणि आम्ही युनियनमध्ये जाऊन आमच्या पोटासाठी मागायला लागलो तर ते चालत नाही ! असला कुठला खानदान आलाय तुमचा—सडकेवर आणा म्हटलं मी !

'त्यांनी मग काय केलं रातोरात माझ्या मामाला फोन करून कळवलं की, तुमची भाची इथं खूप गोंधळ करायला लागलीय. गल्लीतली सगळी माणसं तिच्याविरुद्ध आहेत, तिला मारहाण होणार तर ताबडतोब गावाकडे घेऊन जा तिला ! सकाळी दिवस उगवायलाच मामा आला आणि मला आजऱ्याला घेऊन गेला !

'मी तेव्हा काय 'आयडिया' केली—माझ्या दादल्याला ताकीद दिली आणि सांगितलं, तुम्ही पाठोपाठ दुसऱ्या गाडीनं आजऱ्याला या आणि म्हणा—तू गेल्यापासून पोरगाच घरात नाही ! माझ्या नवऱ्यानं मी ताकीद दिल्याप्रमाणंच केलं. पाठोपाठ आला, म्हणाला पोरगा घरात नाही ! मी मामाला म्हटलं, आता मी इथं रहात नाही. गेलंच पाहिजे—आणि तबडतोब गाडी पकडली !

'कंडक्टरला म्हटलं दोन रुपये जादा घे ! आता मधल्या सिटा घेण्यासाठी गाडी थांबवू नको. अहो, आजऱ्यापासून निपाणीला येईपर्यंत वाटेत खूप खेडी ! जरा टिंग् केलं की थांबली गाडी ! तो कंडक्टर म्हणाला, बाई, तुम्ही कुठल्या ? मी म्हटलं कोल्हापूरची !

तो म्हणाला, मी पण कोल्हापूरचा ! होय, तुम्हाला शिवाजी चौकात बघितल्यासारखं वाटतंय, असं मी उगाचच म्हटलं–आणि तो शिवाजी-चौकात राहाणाराच निघाला ! त्यानं मग आजऱ्यापासून जे गाडी सोडली ते थेट निपाणीत–मधे कुठं थांबलाच नाही !

'इथे सगळ्या कामगार बाया आणि 'सर' म्हणत होते आता चाची गेली. चाची आता येत नाही.' इतक्यात मी साडेपाचच्या ठोक्याला 'आले' म्हणून हजर !

'–आता आमचे 'सर' मला नेहमी म्हणतात, चाची, तुम्ही फार बोलता, जरा कमी बोला ! आता आमचे हे पोलीसलोक समन्स का काय घेऊन येतात, अंगठा उठव म्हणतात; पण त्याच्या प्यॅडात शाईच नसते–उठवला तरी उठत नाही ! असला ह्यांचा कारभार ! आता परवा कचेरीवर बोलवलं होतं, गेले. तिथं बाहेरच एक कोटवाला माणूस बसला होता–पाढऱ्या कपड्यातल्या पोलीस हो ! मी त्याला म्हटलं ,बाबा, जरा खिसा सावरून बस, आम्ही चॅप्टर बाया ! तो माझ्या तोंडाकडे बघतच राहिला.

तिथला एक पोलीस म्हणाला, 'बाई तुम्ही लई बोलता–तुम्हाला पकडायला पिंजरा घेऊन येतो. मी म्हटलं, या की–तसल्या पिंजऱ्यात मी कोंबड्या कोंडते ! बाई, तुम्हाला सारखं कचेरीत बोलवू ! म्हटलं बोलवा की– ही कचेरी म्हणजे नुसता कचरा लोटून कोठ्यात ठेवते मी ! बाई, तुम्हाला चिकोडी कोर्टात उभं करतो ! करा की–तसलं कोरट म्हणजे माझ्या घरचा परसदारचा रस्ता म्हटलं मी ! माझं आणि त्या पोलिसाचं सारख हे असं भाडण असतंयच !

'एक दिवस कचेरीत बोलावलं म्हणून गेले. आतल्या खोलीत फौजदार बसला होता. मी थूऽऽ करून थुकले आणि आत गेले. हवालदार म्हणाला, बाई, तुम्ही थुकला का ? म्हटलं, कचेरीत तुमच्या चिलटं फार–तोंडातच गेलं म्हणून थुकले !–ह्यांच्याशी असंच वागायला पाहिजे हो ! ह्यांना जबाबच दिला पाहिजे !'

'चाचीचं बोलणं ऐकताना मी अगदी गुग होऊन गेलो. इतका निर्भीड स्पष्टवक्तेपणा आज-काल अपवादातच अनुभवायला मिळतो. चाची खरोखरीच एक वीरभगिनी होती. बेळगाव जिल्ह्याच्या ह्या परिसरातच राणी चन्नाम्मा कित्तूर जन्मास यावी असाच इकडच्या मातीचा गुण असावा. चाचीला मनोमन अभिवादन करून जाता-जाता उगाचच चिडवावं म्हणून मी म्हणालो,–'चाची, तुम्ही असं वागायला लागलात, कायदा पाळला नाहीत, तर सगळा गोंधळ होईल ! सरकारला राज्य करणं कठीण होईल...!' माझं वाक्य पुरं होण्याअगोदरच चाची उसळून म्हणाल्या–

'मी तुम्हाला काय सांगतो ते नीट ऐका ! कायदा पाळावा केव्हा आणि कशासाठी ? आम्ही कुणाबरोबर भाडण–मारामारी केली त्याला कायदा लागू करावा, आम्ही घेतो की ओट्यात ! आम्ही आमच्या पोटासाठी मागतोय त्याला हे कायदा लागू करायला लागलेत; पण मालकाचे गुड येऊन, आमच्या घरातून तरण्या पोरीस्नी ओढत्यात तवा कायदा नसतो व्हय ? त्या टाइमाला ह्या सरकारचा कायदा कुठं असतोय ? त्याच्यावर का होत नाही केस ? आम्ही सडकेनं चालताना आम्हाला धक्के मारतात, आमची छेड काढतात त्यांच्यावर का होत नाही केस ? आम्ही–पोटासाठी भांडतोय तर आमच्यावर मात्र डब्बल केस !

'दहा पोलिसांनी मला काठीनं मारलं आणि रातच्या बाराला आणून इथं सरांच्या घरी टाकलं–सराची बायको माझी आई झाली बघा ! तिनं उठून, स्टो पेटवून, पाणी तापवून रात्रभर माझं अंग शेकून काढलं. अंथरुण करून इथं झोपवलं आणि तिथं कुठं तरी गावात दंगा होऊन बस पेटवली लोकानी, ती केस माझ्यावर ! मी तर इथं पडून–मग बस जाळायला तिथं कवा गेले होते ? दगडफेक करायला कवा गेले होते ?–पण माझ्यावर केस ! हा कुठला कायदा ते मला अगोदर सागा !

'हे मला अंगभर मारलेले हिरवे वळ अजून जाईनात त्यासाठी कुठला कायदा आहे ? आम्ही आमच्या मालकाकडं नुसता बोनस मागायला गेलो होतो–मग कायदा कुणी मोडला ?'

□

चाचीच्या ह्या प्रश्नांना कोण उत्तर देणार ? आहे एखाद्या कायदेपंडिताची तयारी ?–आणि प्रश्न केवळ कायद्याचाच नाही, चाचीनं तर माणुसकीलाच आव्हान दिलं आहे. माणुसकी शिल्लक असेल तर चाचीच्या सर्व प्रश्नाना उत्तरं नक्की मिळतील–पण चाचीचे प्रश्न अनुत्तरित राहिले तर ? तर हा देश दुर्दैवी आहे असाच त्याचा अर्थ ! मग खुशाल एखाद्या सम्राज्ञीनं आपल्या युवराजासह ह्या देशावर हुकमत गाजवावी ! तेवढीच ह्या देशाची लायकी.

सरांचा, सुनीताअक्काचा, संध्याचा आणि चाचीचा निरोप घेतला आणि निघत नव्हता तरी घरातून पाय बाहेर काढला. बाय् बाय् करायला गोपीनाथ धारिया आले होते. आयेशा-शान-ए-दिवानला बघून धारिया म्हणाले, 'काय चाची, इथं कुठं ?'

माझ्याकड पाहून मिष्किलपणं हसत चाची म्हणाली, 'ये अजब नाता देखो, मैं उनको भाई करके पुकारती और वो मुझे चाची कहते हैं–मै उनकी बहेन और वो मेरे भतिजे–है की नही अजीब नाता ? ये निपाणीकी हर एक बात ऐसीच अजीब है.'

□

गाडी पुण्याच्या दिशेनं सुसाट धावत होती. माझं मन मात्र निपाणीतच गुतून पडलं होतं. निपाणीतील मूठभर व्यापारी आणि दलाल ह्यानी तंबाखू उत्पादक शेतकरी, तंबाखू कामगार-स्त्रिया आणि विडी कामगार-स्त्रिया ह्याचं जे अमानुष शोषण चालवलं होतं त्याबद्दल अडीच-तीन दिवसात जी माहिती माझ्या हाती आली होती ती मस्तक बधिर करणारी होती.

निपाणी परिसरातील शेतकरी आणि कामगार-स्त्रिया ह्यानी वेळोवेळी केलेला आदोलनाचा प्रयत्न तेथील व्यापाऱ्यानी, राज्य-कर्त्यांशी हातमिळवणी करून दरखेपेस कसा पद्धतशीरपणे हाणून पाडला ह्याचा हा इतिहास अभ्यासण्यासारखा होता. ह्या सर्व प्रकरणात पोलीस खात्यानं स्वीकारलेली भूमिका चिंता करावी अशी

**'आम्ही आमच्या पोटासाठी मागतोय त्याला हे कायदा लागू करायला लागलेत !'**

होती. भारतावर राज्य करण्यासाठी इंग्रजांनी जेव्हा इथं पोलीस खातं निर्माण केलं, जे पोलिसी कायदे केले तेच स्वातंत्र्यानंतर चौतीस वर्षांनी तशाच पद्धतीनं अजूनही अमलात आणले जातात, ही गोष्ट खरोखरच धक्कादायक होती.

–गाडी पुण्याची वाट काढत होती आणि मनात विचारांचा कल्लोळ माजला होता–वादळ उठलं होतं.

फक्त तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनीच ह्या लढा उभा करायचा म्हटलं तर त्यांची ताकद अपुरी पडणार का ?–ज्याप्रमाणं भाताच्या शेतकऱ्याचा प्रश्न कठीण म्हणून दुधासारख्या ताकदवान वस्तूबरोबर त्याची सांगड घालण्यात आली, कांद्याला उसाबरोबर जोडण्यात आलं, तसं तंबाखूला इतर कुठल्याच शेतमालाबरोबर जोडणं शक्य नव्हतं. मग हे शेतकरी प्रभावी लढा कसा उभा करणार ?

समजा, शरद जोशींनी तंबाखूचा लढा हाती घेण्याचं ठरवलं तर शेतकरी संघटनेच्या 'शेतकरी तितका एक एक' ह्या घोषवाक्याची सत्यासत्यता पडताळून पाहण्याची वेळ येणार! बिगरतंबाखू उत्पादक शेतकरी, निपाणी परिसरातील तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्याच्या हाकेला प्रतिसाद देतो की नाही ते ह्या लढ्यात स्पष्ट होणार !

निपाणीच्या तंबाखू शेतकऱ्याची ताकद अपुरी पडते आहे असं दिसू लागले तर महाराष्ट्रातील नासिक आंदोलन गाजवणारा शेतकरी, धुळे, जळगाव, मराठवाडा, विदर्भ येथील शरद जोशीच्या विचारानं प्रभावित झालेला शेतकरी स्वयंस्फूर्तीनं कशा प्रकारचा प्रतिसाद देतो हे अभ्यासणं महत्त्वाचं ठरणार! तामिळनाडचे नारायणस्वामी, कर्नाटकातील रयत संघटनेचे रुद्राप्पा ह्यांच्या प्रतिक्रिया काय असतील ?

शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव का दिला जात नाही ह्याचं महत्त्वाचं कारण म्हणून शरद जोशी नेहमी सांगतात–'जी मंडळी निवडणुकीच्या वेळी पक्षाच्या पुढाऱ्याना लाखो आणि कोटी रुपये पुरवतात, ज्या पैशाच्या जोरावर निवडणुकीच्या वेळी जीपगाड्या प्रचाराचा धुरळा उडवत फिरतात त्या मंडळींना शेतकऱ्याच्या मालाला भाव देणं आवडणारं किंवा परवडणारं नसतं–म्हणून शेतमालाला भाव दिला जात नाही.' निपाणी तर श्रीमंत व्यापारी आणि नवकोट नारायणांची नगरी. इकडच्या व्यापाऱ्यानी निवडणुकासाठी लक्षावधी रुपये दिले असतील तर तंबाखू शेतकऱ्याला योग्य दर सहजासहजी मिळणं कठीण !

निपाणीतील तंबाखू उत्पादक शेतकरी जर आदोलनात उतरायला तयार झालो तर तेथील तंबाखू आणि विडी कामगार-स्त्रियादेखील त्याला मोठ्या प्रमाणात साथ देणार हे निश्चित ! दहा-बारा हजार संघटित कामगार-स्त्रियाचा एक जबरदस्त 'फोर्स' निपाणीत तयार झाला आहे. ह्या कामगार-स्त्रियांनी वेळोवेळी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी जेव्हा आंदोलनं केली तेव्हा ज्याप्रमाणं निपाणीतील सर्वसामान्य नागरिकांनी स्वयंस्फूर्तीनं त्यांच्या भाकरीचा प्रश्न सोडवला, त्याचप्रमाणं जरूर पडल्यास ह्या कामगार-स्त्रिया तंबाखू आंदोलनाच्या वेळी शेतकऱ्यांच्या चुली काही काळ तरी चालवून दाखवतील हे निश्चित ! अर्थात आंदोलन होणार असेल तर सर्व प्रथम तबाखू उत्पादक शेतकऱ्यांनी संघटित होणं अत्यंत महत्त्वाचं !

मागील वेळेप्रमाणं फक्त अकोळ किंवा खडकलाटच्या शेतकऱ्यांनी प्रयत्न करून हा लढा यशस्वी होणं सर्वस्वी अशक्य. त्याचप्रमाणं आरंभशूरत्व दाखवणाऱ्या अकोळच्या शेतकऱ्यानं लढ्यात शेवटपर्यंत टिकणंदेखील महत्त्वाचं !

निपाणीतील चाळीस-पन्नास व्यापाऱ्यांच्या हातात तंबाखूची व्यापारपेठ आहे असं वरकरणी दिसत असलं तरी खऱ्या अर्थानं सर्व कारभार चार-पाच बड्या दलालाच्याच हातात आहे. इतर व्यापारी 'चिल्लर' म्हणावे असे ! मूठभर व्यापारी-दलाल आणि पन्नास हजार तंबाखू उत्पादक शेतकरी आणि दहा-बारा हजार कामगार-स्त्रिया असं ह्या आंदोलनाचं स्वरूप !

दिल्लीचं मध्यवर्ती सरकार तर वारंवार घोषणा देतंय–'शेतकऱ्यांचं कल्याण करणार ! दलालाच्या पाठीत बडगा घालणार !' निपाणीच्या तंबाखू उत्पादक शेतकऱ्यानी जर दलालांपासून शोषणमुक्तीसाठी आंदोलन छेडायचा निर्णय घेतला तर सरकारच्या परीक्षेची वेळ येणार ! सरकार तेव्हा दलालाच्या पाठीत बडगा घालणार की शेतकऱ्यांच्या ?– दलालानी निवडणुकीसाठी किती पैसे खर्चले ह्यावर तर हा निर्णय अवलंबून असणार नाही ना ?–मग शेतकऱ्याचं कल्याण करणार, ह्या घोषणेचा खरा अर्थ काय ?

सुभाष जोशी म्हणाला होता–'आमचा लढा दलालांविरुद्ध आहे. आम्ही लढा केला तर सरकार आमच्या पाठीशी उभं राहील अशी आमची अपेक्षा आहे. कांदा आंदोलनाच्या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अंतुलेसाहेब म्हणाले–'दलालांशी मी वाटाघाटी करणार नाही !' इथला शेतकरी आता दलालाच्याविरुद्धच उठण्याच्या तयारीत आहे. सरकार आता कुणाशी वाटाघाटी करतं बघू या ! तशात ह्या आंदोलनाचं नेतृत्व करण्याचं शरद जोशींनी जर मान्य केलं तर इकडच्या व्यापारी–दलालांना निश्चितच गंभीरपणे विचार करावा लागणार आहे. शेतकऱ्यांच्यामध्ये शरद जोशींना आज जबरदस्त मोठं स्थान आहे. सर्व देशभर शरद जोशींचं नाव गाजतंय. ते जर निपाणीला आले आणि इकडच्या शेतकऱ्यांचं नेतृत्व करायचं त्यांनी ठरवलं तर फार मोठ्या प्रमाणावर शेतकरी आंदोलनात उतरतील हे निश्चित. ह्यापूर्वी आम्ही तंबाखू शेतकऱ्यांची एकी करण्याचे प्रयत्न केलेत, पण त्या प्रयत्नाना म्हणावं तसं यश आलं नाही, हे सत्य आहे शरद जोशींनी ह्या प्रश्नात लक्ष घातलं तर मात्र शेतकरी आत्मविश्वासानं पुढं येईल !

'इकडच्या शेतकऱ्यांचा शरद जोशीबरोबर संपर्क साधण्याचा विचार आहे ह्याची कुणकुण व्यापाऱ्यांना लागली आहे. त्यामुळं निपाणीतील व्यापारी–दलाल अतिशय सावधपणे बोलत आहेत. काही भागातील शेतकऱ्यांना एक-दोन रुपये चढ दर देऊन त्यांना संघटित होण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न हे व्यापारी करणार –संघटित होणाऱ्या शेतकऱ्यांच्यात फूट पाडण्याचा उपद्व्याप हे करणार ! खेडोपाडी छोट्या वखारी उभ्या करून शेतकऱ्यालाच तंबाखूचा जर्दा बनवून द्यायला ते सांगणार. त्यामुळे निपाणीतील कामगार-स्त्रियांचा रोजगार बुडून त्यांच्यात आणि शेतकऱ्यांच्यात तेढ निर्माण व्हावी असा त्यांचा डाव असणार !

'शेतकऱ्याना आणि कामगार–स्त्रियांना व्यापाऱ्यांच्या ह्या कारस्थानाची वारंवार पूर्वसूचना देण्याचं काम आम्ही हाती घेतलं आहे. व्यापाऱ्यांचा कावेबाजपणा शेतकऱ्याला आणि कामगार स्त्रियांना समजावून सागण्याच्या प्रयत्नात आमचे कार्यकर्ते आहेत– पण तेव्हढ्यानं भागणार नाही. खेडोपाडी फिरून शेतकऱ्याला जागं करणं, सावध करणं आवश्यक आहे.

'आतापर्यंत आम्हीच कमी पडत होतो म्हणून लढा उभा रहात नव्हता. ह्या खेपेस ती चूक होऊन उपयोग नाही. एक ना एक दिवस हा लढा, हे आंदोलन यशस्वी होणारच ! शेतकऱ्यांच्या मनात तसा विश्वास निर्माण करण्याची जबाबदारी मात्र आम्हा कार्यकर्त्यांची आहे. ही आंदोलनाची नुसती सुरुवात आहे. आम्ही किती प्रमाणात संघटित होतो, किती काळ संघटना टिकवू शकतो त्यावर अंतिम यश अवलंबून आहे. संघटित झाल्यास काय फायदा होतो हे निपाणीतील तंबाखू आणि विडी कामगार-स्त्रियांनी शेतकऱ्याला दाखवून दिले आहे. ह्या स्त्रिया पुरुषापेक्षा निधडेपणानं लढल्या आहेत, इथून पुढं लढणार आहेत. शेतकऱ्यानी मागे रहाण्यात आता अर्थ नाही ! '

हा सुभाष जोशी एखाद्या गोष्टीकडे त्रयस्थाच्या भूमिकेतून पाहून स्वच्छ डोक्यानं विचार करू शकतो ही त्याची खासियत आहे. तो पोथीनिष्ठ नाही म्हणूनच हे करू शकतो नाही तर एक समाज-कार्यकर्ता नेहमी सांगत असतो– 'सामाजिक समतेच्या लढ्यात आपली बांधिलकी कोणती ह्याबद्दची भूमिका स्पष्ट हवी. समाज-परिवर्तनाला प्रतिबद्ध अशा संघटनांची आज जरुरी आहे. त्यासाठी सैद्धांतिक पातळीवर चिंतन, चर्चा, विचारविनिमय, विश्लेषण, कृती, प्रतिकृती वगैरे होणे अत्यावश्यक आहे. या संदर्भात वर्ग–वर्ण संदर्भाची मांडणी केवळ वर्गभेदातीत आणि वर्णांतर्गत अशाच स्वरूपाची न रहाता ती वर्ण–वर्ग भेदातीत राहूनही वर्णांतील वर्गभेद आणि वर्गातील वर्णभेद या सर्वांना छेदून वर्णभेदातीत आणि वर्गांतर्गत अशा क्रमानं शेवटी वर्ग–वर्ण–समन्वय क्रातीत परिपूर्ण झाली पाहिजे. त्यासाठी आज वेगवेगळ्या संघटना ज्या एकमेकाना छेद–परिच्छेद देत आच्छादित आहेत, एकमेकांतील वर्ण–वर्ग–वाद वाढवीत आहेत. त्यांच्यातील हे मतभेद नाहीसे व्हावेत आणि संघटना अधिक संघटित व्हाव्यात म्हणून काही सैद्धातिक मूल्ये आणि भौलिक सिद्धात जोपासणं आवश्यक आहे.' सुभाष जोशी असं बोलत नाहीत हे शेतकऱ्यांचं आणि कामगार स्त्रियाचं परमभाग्य ! नाही तर व्यापारी दलालांच्याऐवजी सामाजिक कार्यकर्त्यांचाच धसका शेतकऱ्यांच्या मनानं घेतला असता.

निपाणीतील शेतकऱ्याच्या मनात तंबाखू व्यापाऱ्याच्याबद्दल प्रचंड भीती आहे हे सत्य. हे मानसिक दडपण त्यानं झुगारून देणं जरुरीचं, त्याशिवाय आंदोलन उभं रहाणं अशक्य !

शेतकरी आज वैतागलेला आहे, उद्विग्न झालेला आहे, पोळून निघाला आहे. अशा वेळी कार्यकर्ते जर वर्ण – वर्गभेद आणि सैद्धांतिक मूल्यांची जोपासना ह्यावर वायफळ चर्चा करण्यात वेळ दवडू लागले तर त्यामधून शेतकऱ्याची फार मोठी फसवणूक केल्यासारखं होईल. शेतकरी आळस झटकू लागलाय तेव्हा त्याला पूर्णपणे जागं करणं हीच कार्यकर्त्यांची जबाबदारी; पण सुभाष जोशीसारखे किती कार्यकर्ते असतील ? – स्वच्छ डोक्यानं विचार करणारे !

आळस झाडून जागा होणाऱ्या शेतकऱ्याच्या मनावरील दडपण सर्वप्रथम दूर करणं महत्त्वाचं. नासिक आंदोलनाचे एक सूत्रधार माधवराव खंडेराव मोरे आपल्या जाहीर भाषणातून राजकीय पुढाऱ्यांची अशी काही खरडपट्टी काढत की शेतकऱ्याच्या मनातील भीती पार पळून जावी. ते इथे झालं तर ?

तंबाखू आणि विडी कामगार–स्त्रियानी निपाणीत आंदोलनं करून ह्या व्यापारी – दलालाना नमतं घ्यायला लावलेलं इकडच्या शेतकऱ्यानी पाहिलं आहे. त्याचा थोडा तरी परिणाम शेतकऱ्याच्या मनावर झालाच असणार ! तंबाखू शेतकऱ्यांच्यामधेदेखील एखादे माधवराव खडेराव मोरे नसतील कशावरून ?

निपाणी सोडण्यापूर्वी मी सुभाष जोशीला विचारलं होतं–'आतापर्यंत निपाणीत चालू असलेली आणि काही प्रमाणात यशस्वी झालेली चळवळ कामगार–स्त्रियाची ! ह्या चळवळीमुळं बड्या दलालाच्या प्रतिमेला तडा गेला हे निश्चित ! त्याचा परिणाम शेतकऱ्याच्या मनावर थोडा-फार झाला असेलही. शरद जोशी आणि माधवराव खंडेराव मोरे जर निपणीला येऊ शकले, त्यांनी हा लढा उभा करण्याचं ठरवलं तर त्याचा दलालाच्यावर दबाव पडणार असं आपण गृहीत धरू या. शरद जोशी जर आले तर तुम्हा सर्वांबरोबर चर्चा करून लढ्याचं काय तंत्र ठरवतील तो नंतरचा भाग. सध्याच्या आहे ह्या परिस्थितीत शेतकरी आणि कामगार–स्त्रिया एकत्र येऊन काही तरी मार्ग काढू शकतील का ? यंदा व्यापारी शेतकऱ्यानाच जर्दा बनविण्यास सागण्याची शक्यता आहे, असं जर असेल तर दलालाना तंबाखू न विकता शेतकऱ्यांनीच त्याचा जर्दा बनवून कामगार–स्त्रियामार्फत विडी बनवली तर ?'

सुभाष म्हणाला होता–'एक गोष्ट नीट ध्यानात घ्या. तंबाखूवर प्रक्रिया करून त्याचा जर्दा बनविणाऱ्या कामगार–स्त्रिया वेगळ्या. आणि विडी कामगार–स्त्रिया वेगळ्या ! त्यांची युनियन एकच असली तरी समस्या वेगळ्या वेगळ्या आहेत! आज अशा प्रकारे विडी तयार करून बाजारात विक्रीला आणण्याइतकी आर्थिक ताकद शेतकऱ्याच्यात आणि कामगार–स्त्रियाच्यात नाही. भविष्यात हे शक्य आहे–आणि तसं व्हावं अशी अपेक्षा ठेवायलादेखील हरकत नाही. प्युअर निपाणी तंबाखूची किसान–कामगार विडी संपूर्ण भारतामध्ये खपेल हे निर्विवाद ! आज मात्र त्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा उभी करण्याइतकी ताकद शेतकऱ्याच्यात आणि कामगार–स्त्रियात नाही. आज मुख्य प्रश्न आहे, व्यापाऱ्याचं शेतकऱ्यावर असलेलं दडपण उठविण्याचा ! शरद जोशी जर इथं आले तर व्यापाऱ्यांचा निम्मा दबाव पहिल्या फटक्यातच कमी होणार!

'आपला दबाव कमी होऊ नये म्हणून व्यापारी कर्जवसुलीसाठी शेतकऱ्याच्या मागे लागतील ही शक्यता आहे. त्यांना शेतकऱ्यानी स्वच्छपणे सागायचं आहे–आता आम्ही ऐकणार नाही ! व्यापाऱ्यांना पाहिजे असल्यास त्यानी कोर्टात जावं. मुळातच हे कर्ज संपूर्णपणे अनैतिक आहे. प्रकरण कोर्टात गेल्यास व्यापारीच गोत्यात येतील ! 'ह्या भागात शेतकऱ्यांना आंदोलनाची थोडी-फार पार्श्वभूमी आहे; पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे, शरद जोशीचा विचार आज इतक्या झपाट्यानं पसरतो आहे की, देशभर शेतकरी आंदोलनाचं लोण पसरणार अशी शुभचिन्हं आता दिसू लागली आहेत. आम्ही ह्या शुभघटकेचा फायदा उठवलाच पाहिजे !'

शरद जोशीचा विचार म्हणजे शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याचं शुभचिन्ह ! निपाणीच्या तंबाखू उत्पादक शेतकऱ्याला दलालाच्या पिळवणुकीतून मुक्तता हवी होती, त्यासाठी आंदोलनाची तो तयारी करत होता;–पण त्याला नेतृत्व हवं होतं योद्धा शेतकरी शरद जोशीचं ! हे नेतृत्व त्याला मिळणार का ?

– गाडीनं कात्रजचा घाट ओलाडला. पुण्याचे दिवे लुकलुकू लागले आणि मी मनात उमटू पहाणाऱ्या असंख्य विचारांना आवर घातला ! ( क्रमशः )

श्यामचा संसार (कथा चौदावी)

फिरोज रानडे

# मुक्ती चळवळ व श्याम

आज रविवार असूनही राधा अगदी लवकर उठली होती व स्वयंपाकघरात काही तरी खुडवुड करत होती. श्याम म्हणाला, 'बोंबला, आजचा रविवार, रविवारसारखा काही जाणार नाही असं दिसतं.' राधा त्याच्यावर ओरडून 'उठा आता' म्हणायच्या आत श्याम उठला व मुलाना उठवू लागला.

काल संध्याकाळी व रात्री राधाने सगळ्याना रविवारचा तिचा काय कार्यक्रम आहे हे सागितलं होतं, त्यामुळं राधा का लवकर उठली आहे व तडातडा कामाला का लागली आहे हे श्यामच्या चटकन लक्षात आलं. आपण स्वत: हाका न मारता उठून व पोराना उठवून राधाच्या कार्याला हात-भार लावणं हे आपलं कर्तव्य आहे, ह्या भावनेनं व नवरा, मुलं परत परत हाका न मारता उठली की बायकांना एक तऱ्हेचं बरं वाटतं तसं राधाला बरं वाटावं ह्या हेतूनं श्याम चटकन उठला व पोरांना उठवू लागला. तेवढ्यात स्वयंपाकघरातून राधा ओरडली, 'पोराना आतापासून उठवून ठेवू नका, माझं जरा पोळ्या करणं होऊ दे, मग उठवा. नाही तर माझ्या कामात–चहा दे, दूध दे–म्हणून खोळंबा करतील.'

बायकांचा सगळ्यात पारा खूप चढलेला असतो तो पोळ्या करताना, हे श्यामनं बघून ठेवलं होतं. त्यांचा बरा मूड भात-पिठलं करताना, चागला खिचडी करताना व बेस्ट मूड म्हणजे ब्रेड व आमलेट करताना असतो, हेही श्यामनं बघून ठेवलं होतं. म्हणून पोळ्या करताना त्यांना काहीही विचारलेलं वा सागितलेलं तर चालत नाहीच, पण अगदी भारीतला भारी विनोदसुद्धा चालत नाही!

पोळ्या करण्याचं कामच तसं किचकट व कंटाळवाणं असतं. आधी उकडत कोण असत, त्यात पंखा नसतो. स्वयंपाकाचा ओटा करून घेतला असल्यानं उभं राहून पोळ्या कराव्या लागतात. गॅसचा उष्मा सरळ तोंडावर व कपाळावर येत असतो. त्यातून मुंबईचा घाम! म्हणजे कोणा प्रसिद्ध चित्र-काराचे 'ओलेती' चित्रच—पण चिडचिड-लेल्या रागातलं–माणसाला बघायला मिळतं.

राधाच्या हुकमाप्रमाणं पोरांना उठवायचं थांबवून श्याम दात घासू लागला. आता पोळ्या होईपर्यंत राधाशी बोलणं शक्य नव्हतं म्हणून मनाशीच बोलू लागला.

देव तरी काय वस्ताद आहे पहा. देव म्हणजे 'परमेश्वर' ह्या अर्थी. त्याने भले कबीराचे शेले विणले असतील, भले जना-बाईची धुणी–अगदी कडक उन्हात वा कडक थंडीत–चंद्रभागेच्या थडी धुतली असतील; पण त्या दयाळू देवानं कोणा भक्तिणीच्या पोळ्या वा भाकरी काही कधी करून दिल्या नाहीत. म्हणजे देवालासुद्धा जे काम अवघड वाटतं ते काम राधा दररोज करते ह्याचं श्यामला कौतुक वाटलं.

श्यामचं तोंड धुवून झालं. राधाच्या पोळ्या पण होत आल्या होत्या. त्यामुळं तिचा मूड दर पोळीगणिक ठीक होत चालला होता. त्यात आणखी भर पडावी म्हणून श्याम स्वयंपाकघरात जाऊन म्हणाला, 'अग, जर तुला एवढं सकाळचं जायचं आहे तर मग पोळ्या कशाला करत बसलीस? आम्ही ब्रेड खाल्ला असता की!'

'काही नकोत उपकार तुमचे व तुमच्या मुलाचे. एक दिवस ब्रेड खाल आणि आयुष्य-भर काढत राहाल. तुम्ही नाही तर ती बया आहे ना?' राधा रागारागानच माडे कर-तात तशा पातळ पोळ्या करत म्हणाली.

हे बायकांच बरं असतं. मुलांचे चांगले गुण गायचे असले, त्यांना चांगले मार्क मिळाले किंवा काही बक्षीस मिळालं की, ती गुणी मुलं 'माझी' होतात; पण तीच वाईट गुणांच्या वेळी, कपडे जागच्या जागी ठेवत नाहीत वगैरेच्या वेळी 'तुमची' होतात.

राधाच्या वाक्यातली 'बया' म्हणजे त्यांची मोठी मुलगी अंजू होय, हे सागणे नकोच अन् अनुभवी लोकाना बया म्हणजे सासूबाई वाटतील म्हणून हा खुलासा. देव आई-मुलांना ३६ आकड्यात जन्माला का घालतो हे कळत नाही.

हा ब्रेडचा बाण तर फुकट गेला. आता आपल्या भात्यातला दुसरा बाण काढत श्याम म्हणाला, 'आता तू आघोळ वगैरे करायच्या मागं लाग. मी चहा करतो' हा श्याम-बाण मात्र राम-बाणासारखा लागू पडला. राधा थोडी खूष झाली व तिनं गॅसवरचा तवा उतरवून ठेवून चहाचं पाणी ठेवलं व पदरानं कपाळावरचा घाम पुसत स्वयंपाकघरातून बाहेर जाता जाता म्हणाली, 'थँक्यू.' श्यामनं बऱ्याच गोष्टीची अपेक्षा केली होती; पण राधाचे गोड 'थँक्यू' ऐकून म्हणाला, चला, हेही नसे थोडके!

राधाला आज मायाबरोबर कोणत्या तरी मुक्ति-संमेलनाला जायचं होतं, मुक्ती म्हणजे स्त्री-मुक्ती, हे आता महाराष्ट्रातला अगदी स्त्री-पुरुषातला फरक न कळण्या-इतका लहान मुलगाही सांगू शकेल. खरं म्हणजे जगात किती तऱ्हेचे महात्मा आहेत व लता आहेत; पण महात्मा म्हटलं की, जसं डोळ्यासमोर गाधी उभे राहतात व हल्ली हल्ली अॅटनबरो उभा राहतो वा लता म्हटलं म्हणजे लता सोनटक्के वा लता भिडे असं नाव न येता लता मंगेशकरच येतं, तसंच जगात किती तरी तऱ्हेच्या 'मुक्ती' आहेत; पण मुक्ती म्हटलं की, 'स्त्री-मुक्ती'च आठवते हे ह्या चळवळीचं फळ असेल काय?

तर अशा ह्या मुक्ती-लढ्यातली एक सैनिक म्हणून राधा आज मायाबरोबर कुठल्या तरी समेलनाला जाणार होती. मायानं स्वत.ला तर मुक्तीकार्याला वाहून घेतलं होतंच, पण आता ती राधा व इतर बायकांना वाहवण्याच्या मागं लागली होती.

साधारणत: एक-दीडच्या सुमारास उन्हानं लालमोरी झालेली व घामानं थबथबलेली राधा घरी आली. स्त्री-मुक्ती-लढ्यावरची पत्रकं, पुस्तकं व काही मासिकांचे खास

'मुक्ती' अंक ह्यांचा गठ्ठा तिच्या हातात होता. घरात येताच टेबलावर तो भारा टाकत ती म्हणाली, 'थकला बाई जीव अगदी!'

मग त्यांची जेवणं झाली. नंतर राधा वर्तमानपत्रं व श्याम राधानं आणलेली पुस्तकं व मासिकं चाळू लागला. सकाळी राधा गेल्यावर श्यामनं थोडी झोप काढली असल्याकारणानं आता त्याला झोप येणं शक्य नव्हतं.

त्या पुस्तकातल्या व मासिकातल्या बहुसंख्य लेखाचा शेवट 'आता स्त्रिया जाग्या झाल्या आहेत, आता त्या स्वस्थ बसणार नाहीत,' अशा धमक्यांनी केला होता. ते वाचून श्याम चपापला व राधा काय करते आहे म्हणून पाहू लागला. राधा मंद स्वरात घोरत झोपी गेली होती.

स्त्रिया झोपेत नेहमीच निष्पाप दिसतात तशी राधा पण दिसत होती. 'मुक्ती' पुस्तकं व मासिकं वाचून श्यामला आपण आपल्या प्रिय पत्नीवर राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, एवढंच नव्हे तर लैंगिकही अन्याय करतो आहोत याची प्रखरतेनं जाणीव झाली होती. निष्पाप राधाला बघून त्याला अगदी भडभडून आलं. आता ह्यापुढं तरी आपल्या हातून असे अन्याय होऊ नयेत असं ठरवून तो एकेका अन्यायाचा विचार करू लागला.

अर्थात् प्रथम विचार आला राजकीय स्वातंत्र्याचा! आता आपल्यासारख्या सरकारी नोकराला कसलं आल आहे राजकीय स्वातंत्र्य, असा श्यामनं मनाशी प्रश्न केला व जे आपल्याजवळच नाही ते आपण राधाला काय देणार?

ब्राह्मणकुळात जन्माला आल्यामुळे त्याच्यावर तसा सामाजिक वा आर्थिक अन्याय होत नव्हता. कोणत्याही देवळात जायला त्याना परवानगी होती; पण आठवडयातून एक सुट्टीचा वार मिळणार तो वाया घालवण्याची श्याम व राधा दोघाचीही इच्छा नव्हती.

मधे एकदा श्यामचे प्रमोशन मिळण्यात काही तरी घोटाळा झाला होता. त्या वेळी ती दोघं कोणा गणेशाला वा विनायकाला गेली होती. हे दैवत फार जागृत आहे म्हणून प्रसिद्धी होती; पण तिथे गेल्यावर डेनिमच्या निळया जिनस् व मोगल पद्धतीच्या लांब सलवार-खमीसमधल्या तरुण-तरुणीची एवढी गर्दी होती की, श्यामला 'डिसलोयेक' का काय म्हणतात ते हेच, असं वाटलं!

आता राधा उपास-तापास करत असे; पण ते पुरुषी-जुलमामुळं नसून वजन कमी व्हावं व एखाद दिवस तरी पोळया करण्याच्या त्रासापासून मुक्ती व्हावी ह्या हेतूनं करत असे.

निदान आपण राधावर राजकीय, सामाजिक वा धार्मिक तरी अन्याय करत नाही आहोत ह्या विचारानं श्यामला बरं वाटलं. एवढं होईपर्यंत राधा उठली. उठल्यावरचं राधाचं पहिलं वाक्य म्हणजे, 'एक दिवस दुपारची पडेन म्हटलं तर ते काही नशिबी नाही. एक मिनिट काही डोळयाला डोळा लागला नाही.' श्याम मनाशी म्हणाला, 'भले! चागली दीड-दोन तास घोरत पडली होतीस, मग ते काय डोळयाला डोळा लागल्याशिवाय का?' पण श्याम हे मोठयानं काही बोलला नाही. त्यानं आता ठरवलं होतं की, राधावर कोणताही अन्याय होऊ द्यावयाचा नाही.

राधा तोंड धुऊन व चहाचे दोन प्याले घेऊन आली. नाही म्हटलं तरी दुपारची चागली झोप झाली असल्याकारणानं मूळची गोरी राधा थोडी गुलाबी दिसत होती व एकंदर खूष दिसत होती. श्यामच्या मनात आलं की स्त्री-स्वातंत्र्याच्या मागण्यांच्या यादीत बायकांनी दुपारच्या झोपेची कशी काय मागणी केली नाही?

श्यामनं आता आपण राधावर काही आर्थिक अन्याय तर करत नाही ना, हे राधाकडूनच काढून घेण्याचं ठरवलं. तो म्हणाला, 'राधा, ह्या घरात तुला आर्थिक म्हणजे पैसे वगैरे खर्च करण्याबाबत स्वातंत्र्य आहे ना?'

राधा खळखळून हसली व म्हणाली, 'आता एक तारखेला पगार झाला की पाच तारखेपर्यंत तो जवळजवळ संपलेला असतो. वाणी, दूधवाला, घरभाडं, मुलांच्या फिया, रेल्वेचा पास वगैरे तुम्ही खर्च केला काय वा मी केला काय, सारखंच! मला आनंद आहे की आपल्याला आहे त्या पगारात रहाता येतं—कोणाचं कर्ज तरी नाही. आता तुम्हाला पगार जास्त असता तर बरं झालं असतं, पण तुमच्या पगाराचं स्केलच ते आहे त्याला तुम्ही तरी काय करणार?' मुक्ती-चळवळीत राहून राधा इतकी समजूतदार कशी, असा श्यामला प्रश्न पडला.

त्या दिवशी संध्याकाळी मद्राशाकडे इडली—डोसा खाऊन आल्यामुळं राधाला स्वैपाक करायचा नव्हता. त्यामुळं ती मोठी खूष होती. मुलं दिवसभराच्या खेळण्यानं दमून लवकर झोपी गेली होती. श्याम व राधा गादीवर पडली. दुपारपासून श्यामच्या मनात लैंगिक अन्याय घोळत होता. त्यानं आज आपण होऊन काही करायचं नाही असं पक्कं ठरवलं होतं.

चार—पाच मिनिटांनी राधानं विचारलं, 'बरं वाटत नाही आहे का?'

श्याम म्हणाला, 'बरं आहे की!'

परत चार—पाच मिनिटं तशीच गेली तशी राधाची चुळबुळ सुरू झाली. आता श्यामला पण रहावेना; पण आज त्यानं पक्कं ठरवलं होत की राधाच्या संमतीशिवाय काही करायचं म्हणून नाही!

तो राधाला म्हणाला, 'राधा, 'ह्या' बाबतीत तुझ्यावर काही अन्याय, जबरदस्ती तर होत नाही ना?' त्याला अजूनी राधासमोर लैंगिक वगैरे शब्द बोलण्याची लाज वाटत होती. 'आता तू 'हो' म्हटल्याशिवाय...'

राधा परत खळखळून हसली व त्याला जवळ ओढून जवळ घेत म्हणाली, 'अरे खुळया, अशा गोष्टीत काय परवानगीच्या 'हो' ची वाट पहायची असते?' ☐


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
**मूल्य : रुपये पंधरा**

## रसरशीत भाषेचं कवच ल्यालेलं

# ‘ माझा भाऊ - अण्णा भाऊ ’

कोणत्याही साहित्यिक संस्काराचं ओझं मनाशी न बाळगता सहजपणे झालेल्या लेखनाचा रसरशीतपणा 'रामनगरी' सारख्या आत्मचरित्रातून किंवा बहिणाबाईंच्या गीतांतून आपल्याला जाणवतो. रूढ अर्थाने कोणतंही शिक्षण न घेतलेल्या अण्णाभाऊ साठे याची साहित्यसेवाही अशीच आश्चर्यचकित करणारी आहे. दलित समाजातील साहित्यिक असल्याने अण्णांना इतर पांढरपेशा लेखकांप्रमाणे मानमरातब फारसे मिळाले नाहीत आणि मिळालेल्या सन्मानाची नशा त्यांना चढली नाही. त्यांचं वागणं बेछूट, काहीसं बेफाम भासणारं. त्यांच्या आयुष्याबद्दलही बरंच गूढ कायम असलेलं. अण्णांचे धाकटे भाऊ, शंकरभाऊ साठे यांनी आपल्या या कलंदर भावाचं आयुष्य वाचायचा प्रयत्न 'माझा आण्णाभाऊ' या चरित्रात केला आहे.

शंकरभाऊही अण्णांच्या कलापथकाबरोबर गावोगाव हिंडलेले, त्यांच्यासमवेत बेकार राहिलेले आणि प्रसंगी आण्णाच्या प्रथम पत्नी व मुलाची सगळी जबाबदारीही पेललेले आहेत. खरं तर हे रेखीव चरित्र नाही. तशी अपेक्षाही नाहीच कारण शंकरभाऊंनीच या आठवणी असल्याचं सांगितलंय आणि त्यामुळे त्यात क्रम शोधणं योग्यही नाही. बऱ्याच घटना तुटक वाटतात, काहींचे संदर्भही लगेच लागत नाहीत, पुढे दुवा जोडला जातो, पण तरी यात शंकरभाऊंना असणारा जिव्हाळा, निवेदनाचा प्रामाणिक सूर सतत जाणवतो.

खरं तर हा कलंदर भाऊ शंकरभाऊंनाही कधी पुरता सापडला नाही, याची शंकरभाऊंना जाणीव आहे आणि खंतही आहे. 'फकीर'च्या चित्रपट करण्याच्या भानगडीत आण्णा बरेच फसले ! त्यानतर काही दिवसांनी शंकरभाऊंना भेटल्यावर बराच वेळ रशियाच्या भेटीतील गोष्टी सांगत राहिले. शंकरभाऊ म्हणतात, ' मी ध्यान देऊन ऐकत होतो. कारण दोन वर्षांत आण्णा मला असे कधीच भेटले नव्हते. जर भेटलेच तर एखाद्या ओळखीच्या माणसासारखं भेटत होते.' त्यामुळंच अण्णांच्या लहानपणच्या खोड्या व त्यांचं अण्णांनी बनवलेलं तत्त्वज्ञान याचं वर्णन ते खूप रंगून करतात. अण्णाची शिकण्याविषयीची ओढ, त्यासाठी आठ-आठ दिवस ज्ञानदेव या नातेवाईकाकडे केलेला मुक्काम, गिरणीत, कंत्राटदाराच्या घाटाच्या कामात अण्णा व वडिलांनी उपसलेले कष्ट, पठाणाच्या मदतीने कंत्राटदाराच्या नजरकैदेतून झालेली सुटका यांचं तपशीलातून वर्णन येतं, पण अण्णाच्या लोकनाट्य कलापथकाच्या कार्यक्रमानंतर, लेखनानंतर व त्यांच्या रशियाला जाऊन येण्यानंतर अण्णा हे भाऊ म्हणून शंकरभाऊंना कितीसे लाभले असा प्रश्न येतो.

अण्णांच्या जीवनकार्याविषयी विस्तृत माहिती शंकरभाऊ देतात, पण त्यांच्या संसारातील मानसिक व आर्थिक अस्वास्थ्य, त्याची बेचैनी, दारूच्या व्यसनात त्याचं हरवून जाणं याचा गुंता मात्र शंकरभाऊंनी सोडवला नाही. बऱ्याच गोष्टीत त्यानी मौन पाळलं आहे उलट अण्णाच्या पत्नीविषयी बोलताना ' अण्णांसाठी पहिल्या पत्नीने काहीच केले नाही म्हटले तरी चालेल', असा सूचक पण त्रोटक उल्लेख येतो.

चरित्रकाराला चरित्रनायकाच्या कृतीच्या मागची कारणपरंपरा शोधण्यासाठी परिस्थिती व त्याचे विचार-विकार यांचा विचार करावा लागतो; पण शंकरभाऊ नाणावलेले लेखक नाहीत किंवा त्याना शब्दांचंही फार वेड नाही. त्यानी फक्त आठवणी येतील तशा घटित सत्याच्या स्वरूपात मांडल्या आहेत. त्यांचे अन्वय आपण लावायचे. आणि या प्रयत्नात अण्णाभाऊचं संपूर्ण व सलग असं चित्र त्यात मिळालं नाही तरी त्यांच्या स्वभावाचे ठळक विशेष आपल्याला जाणवतात.

अण्णांचा बेछूट स्वभाव कधीकधी या साध्या माणसापुढं पेच उभा करी. वेळोवेळी अण्णांच्या प्रथम पत्नी व मुलाचा साभाळही शंकरभाऊंनी केला आहे; पण खरं तर हा थोरला भाऊ नंतर एवढा आभाळाएवढा झाला की, शंकरभाऊंच्या हातात सापडेना. लोकनाट्य कलापथकाची मोडतोड झालेली पहाणारे अण्णा तर किती वेळ अज्ञात राहतात, उलगडत नाहीत !

आठवणी सांगितल्यामुळं शंकरभाऊ कधी कधी भान सुटून बोलत राहतात तर कधी एकदम गप होतात. वीर वामनरावांनी कलापथकाचं कौतुक केलं ते भारावून ऐकवतात, तर जयवंताबाईंच्या निघून जाण्यानंतरचं अण्णांचं वागणं किंवा अण्णांचं अचानक कलापथक सोडणं याविषयी फार भाष्य करीत नाहीत; पण अण्णांच्या स्वभावातला भाबडेपणा, पाण्याला घाबरणारे आण्णा, छोट्या अधाऱ्या खोलीत वाकून येताना 'मुजरा सरकार' म्हणणारे अण्णा, महाराष्ट्र व रशियाविषयी हळवे होणारे अण्णा मात्र सलगपणे डोळ्यांपुढे येतात.

' भाषेत लालित्य कोठून असणार ? त्यांचा भाषेचा व्यासंग नाही,' असं प्रकाशक म्हणतात. शंकरभाऊही ' मी लेखक नाही. तेव्हा दोष माझ्या पंधरा दिवसांच्या शिक्षणातून वजा करावा,' असं म्हणतात; पण भाषेचा रसरशीतपणा मात्र अंगभूत आहे. पहिल्याच पानावर पावसामुळं गळणाऱ्या घराचं 'गळत्या घराखाली भांडी ठेवून सा रे ग म चे स्वर शोधीत होते' असं वर्णन येतं. आणि शंकरभाऊंच्या तथाकथित अशिक्षितपणाचं कवच गळून पडतं. ते खुलतात. पुढे लहानपण दिसतं. मध्ये मध्ये जरी कलापथकाची धुरा वाहणारे अण्णा अगदी वेगळ्या, परक्या माणसासारखे भेटले तरी पण पुढं मात्र –

' शंकर तू सुखी आहेस, तुला मुले आहेत, बायको आहे.' म्हणून एकटे एकटे पडलेले अण्णा भावाला सगळी व्यथा सांगतात.

आणि शंकरभाऊंना त्यांचा अण्णा सापडतो. जो लेखक नसतो, चित्रपट निर्माता नसतो आणि पार्टीचा कार्यकर्ताही नसतो. अण्णाभाऊ साठ्याच्या आणखी एका अंगाची आपल्याला ओळख होते.

'माझा आण्णाभाऊ' हे असं चरित्र, आपल्या छोटेपणाचं, लहानपणाचं थोडंसं का होईना, पण दडपण सहन करीतच मोकळं लिहिलेलं व तरीही तसं फारसं न बोलणारंही !

—मृणालिनी नाडकर्णी

माझा भाऊ अण्णाभाऊ
शंकरभाऊ साठे
सुगावा प्रकाशन
पृष्ठे : १३२, मूल्य : १५ रु.

---

## फिनिक्स निवड

# The Zero Factor

Williams Oscar Johanson

---

सत्य हे कल्पितापेक्षाही काही वेळा अद्भुत असते असे म्हणतात. अमेरिकेच्या काही कमनशिबी राष्ट्राध्यक्षाच्या बाबतीत असेच काही झाले आहे, असा पडताळा इतिहास आपणास देतो. १९४० पासून शून्याने संपणाऱ्या वर्षात निवडला जाणारा प्रत्येक अध्यक्ष अध्यक्षच म्हणून मेला. हॅरीसन, लिंकन, गारफील्ड, मॅकिन्ले, हार्डिंग, रुझवेल्ट व केनेडी या सात अध्यक्षांपैकी चार अध्यक्ष अनैसर्गिक कारणांनी, तर उरलेले तीन नैसर्गिक कारणानी मृत्युमुखी पडले. सध्याचे अध्यक्ष रोनाल्ड रीगन यांच्यावरही काही दिवसांपूर्वी असाच एक खुनी हल्ला झाल्याचे आपल्या स्मरणात असेल.

विल्यम ऑस्कर जोहान्सन या लेखकाने हेच सूत्र पकडून ही कादंबरी लिहिली आहे. कादंबरीतले अध्यक्ष वाचतात की नाही, हे कळण्यासाठी कादंबरी मुळातूनच वाचली पाहिजे. ऑगस्टस अल्विहन यॉर्क हे १९८० मध्ये अमेरिकेचे नवे अध्यक्ष म्हणून निवडले जातात. अत्यंत अनपेक्षितपणे पक्षातर्फे त्यांची निवड केली जाते व त्याहूनही अनपेक्षितपणे ते निवडून येतात. यॉर्क हे पूर्वायुष्यात एक नामांकित फूटबॉलपटू असतात. नंतर ते राजकारणात पडतात व सिनेटर म्हणून निवडून येतात अँन्ड्रयू मॉर्ली या मद्याच्या आहारी गेलेल्या राजकीय धंदेवाईकाची (political Professional) यॉर्कच्या निवडणूक मोहिमेच्या व्यवस्थापकपदी निवडणूक झालेली असते. कादंबरीच्या सुरुवातीसच त्याच्या तोंडी शून्याने संपणाऱ्या वर्षात निवडून येणाऱ्या व मृत्युमुखी पडणाऱ्या अध्यक्षाची जंत्री आहे. या मॉर्लीमहोदयाची नंतर चीफ ऑफ स्टाफ म्हणून नेमणूक केली जाते. अध्यक्ष यॉर्क याच्या ह्या निवडीला त्याच्या पक्षातील बऱ्याच जणाचा विरोध असतो, पण ते दबावाला बळी न पडता आपलेच म्हणणे खरे करतात. मॉर्लीच्या मेंदूतूनच आधी निर्देश केलेल्या जीवघेण्या प्रथेचा प्रतिकार करण्यासाठी काही उपाययोजना करायची कल्पना आकार घेते. त्यासाठी तो अॅपल्टन या सुरक्षा सेवेतील कर्मचाऱ्याची मदत घेतो. IBM या कंपनीचा एक कॉम्प्युटर अथवा गणकयंत्र या कामासाठी उपयोगात आणले जाते. अत्यंत आधुनिक असलेल्या या गणकयंत्राचा उपयोग एखादी गोष्ट घडण्याबाबत अगर न घडण्याबाबत असलेली अनिश्चितता कमी करण्यासाठी केला जाणार असतो. या मोहिमेला CIPHER (Computerized intelligence on personal hazard & environmental risk) असे नाव दिलेले असते. या गणकयंत्रात घातपातवादी, जपानीज रेड गार्ड, P. L. O., I. R. A. मार्क्सिस्ट, अमेरिकन नाझी इत्यादी कुठल्याही गटाची ( ! ) व कुठल्याही व्यक्तीची, जिच्यापासून अध्यक्षाना धोका पोहोचण्याची शक्यता आहे त्यांची माहिती नोंद करून ठेवण्यात येणार असते. अत्यंत गुतागुतीच्या या मोहिमेचे उद्दिष्ट स्पष्ट असते—अध्यक्ष यॉर्क याच्या खुनाची शक्यता कमी करणे !

एका धंदेवाईक खुन्याचे पात्र कादंबरीत निर्माण केले आहे. भावनाशून्य व कार्यक्षम असा हा खुनी आपल्यावर सोपवलेली कामगिरी फत्ते पाडण्याबाबत व प्रामाणिकपणाबद्दल (!) प्रसिद्ध असतो. क्यूबन वंशाच्या व्यापाऱ्यातर्फे त्याला अध्यक्षाना ठार मारण्यासाठी एक कोटी डॉलर्सची सुपारी देण्यात येते. खुन्याच्या दृष्टीने हा मानाचा आणि मोलाचा पटका असतो, गुन्हेगारीच्या इतिहासात त्याचे नाव लाल शाईने लिहिले जाणार असते. नाना लटपटी करून तो (खुनी) पत्रकार म्हणून खोटी कागदपत्रे मिळवितो व व्हाइट हाउसमधील पत्रकार परिषदेसाठी तात्पुरते प्रवेशपत्र मिळवितो. तिकडे शिरकाव झाल्यानंतर एका अमेरिकन


सर्वांना आवडेल असा, भेट देण्यास अप्रतिम असा
१९८० च्या २५० दिवाळी अंकांतील निवडक साहित्याचा ग्रंथ !

## 'अक्षर दिवाळी – १९८०'

प्रसिद्ध झाला

डेमी आकार —४४८ पृष्ठे — मूल्य रु. ३६/—
दि. २६–८–८१ पर्यंत सवलतीचे मूल्य रु. २७ फक्त
सत्तावीस रुपयांची मनीऑर्डर धाडणारास आमचे खर्चाने
रेकॉर्डेड डिलिव्हरीने पुस्तक घरपोच धाडू.

* व्यापारी सवलतीसाठी लिहा—

विश्वकर्मा साहित्यालय | २०३५ सदाशिव, टिळक पथ, पारिजातजवळ, पुणे ४११ ०३०

(BS) सहाय्यक निर्मात्याचे ओळखपत्र व कागदपत्रे चोरतो व महत्वाच्या प्रसंगी कुठेही अडथळा न घेता अध्यक्षांपर्यंत पोचण्याची तरतूद करून ठेवतो.

दरम्यान या खुन्याने (Le Bombardier) आधी केलेल्या खुनांची माहिती गणकयंत्रात साठवलेली असते व अशा तऱ्हेचा एक खुनी अध्यक्षाचा अपघाती मृत्यू घडवून आणण्याची शक्यता गणकयंत्राद्वारे ॲपल्टनला कळलेली असते.

स्टेट ऑफ दि युनियनच्या समारंभप्रसंगी अध्यक्षांना देवाघरी पाठविण्याचा खुन्याचा बेत असतो. प्लास्टिक् (Plastique) या विशिष्ट स्फोटक द्रव्याचा उपयोग करून स्फोट घडवून आणण्यात हा खुनी पटाईत असतो. भाषण व्हायच्या आधीच काही दिवस तो नियोजित जागी जाऊन तेथील गालिचाचा एक लहानसा तुकडा कापून तिथे ते स्फोटक द्रव्य भरतो व परत वरती तो तुकडा व्यवस्थित लावून ठेवतो. एका इलेक्ट्रॉनिक नियंत्रकाचा उपयोग करून तो स्फोट घडवून आणणार असतो. परंतु चाचण्यांमध्ये त्याला आढळून येते की, दीडशे फूट अंतरावरून स्फोट घडवून आणताना डिटोनेटरच्या चकतीचा, जवळपासच्या लोकांना ऐकू येईल एवढा आवाज सर्व प्रयत्नानंतरही कायम असतो. हा प्रश्न सोडविण्यासाठी तो अध्यक्षांच्या भाषणाची एक प्रत आधीच मिळवून ठेवतो व त्यातील हशा व टाळ्या पडण्याची शक्यता असणाऱ्या जागा माहीत करून घेतो. यातील एखाद्या टाळयाच्या प्रसंगी तो स्फोट घडवून आणणार असतो.

असो. वरील संदर्भ लक्षात घेता, रीगन याच्यावरील झालेल्या खुनी हल्ल्याचे भाकित गणकयंत्राद्वारे करता आले असते. कारण हल्लेखोराने गेल्या वर्षी कार्टर यांच्या विमानात तीन बंदुका घेऊन शिरण्याचा प्रयत्न केला होता व तेव्हा तो पोलिसांच्या ताब्यात सापडला होता.

एवढे सगळे वाचूनही असे वाटते की, खुनाची शक्यता कमी करता येईल; पण ती समूळ नष्ट करता येणे अशक्यप्राय आहे. (पुस्तकातही त्याचे एक उदाहरण आहे.) त्याचे कारण असे की, गणकयंत्र फक्त त्याला पुरविलेल्या माहितीवरच अनुमान व निष्कर्ष पुरविते. ज्या व्यक्ती गणकयंत्रावरील यादीत नाहीत त्या अध्यक्षाचा खून करण्याची शक्यता संपूर्णपणे कधीच नाकारता येत नाही.

पुस्तकाचा वेग, घटनांची बांधणी व अनपेक्षित शेवट पुस्तक वाचनीय बनविण्यास कारणीभूत ठरतात. पुस्तकातील खटकणाऱ्या एक-दोन बाबी पुढीलप्रमाणे आहेत. अध्यक्ष यॉर्क हे फारच साधेभोळे (naive) असे दाखविण्यात आले आहेत. राजकारणातील दबाव, खाचाखोचा याबद्दल त्यांना काहीच माहिती नाही, असे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे, पण तो तितकासा विश्वासार्ह वाटत नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे, अध्यक्ष यॉर्क यांना दिसणारे मृत अध्यक्षाचे भटकते आत्मे! हे मृतात्मे त्यांना भेटतात, त्यांच्याशी वार्तालाप करतात, तर कधी चांगली बातमी वा भविष्य सांगून त्याना सुखवितात. अशामुळेच लेखकाने शेवटी काढलेला तोडगा अनपेक्षित असला तरी तेवढा विश्वासार्ह वाटत नाही.

अमेरिकेतील सध्याच्या घटना बघता हे पुस्तक रसिकांनी अवश्य वाचावे. भारतातसुद्धा राजकीय कादंबऱ्या लिहायला बराच वाव आहे. आता राजकीय खून वाढीस लागले आहेत. V V I P च्या विमानाचे घातपाताचे प्रयत्न होत आहेत. राजकीय हवेत एक प्रकारची अनिश्चितता आहे. मराठीत मात्र फिनिक्सकडे अरुण साधूंच्या कादंबऱ्या, श्री. भानु काळचाची 'तिसरी घादणी' (मॅजेस्टिकचे रु. ३००० चे पारितोषिक पटकाविलेले), श्री. करंदीकर याची 'नंबर टेन्' व 'ऑपरेशन राजा' इतक्याच राजकीय कादंबऱ्या (Political thrillers) आहेत. या छोटेखानी कंपूतही अरुण साधूची मक्तेदारी आहे.

—रवींद्र बिवलकर

—जे. एन्. पोंडा


## नवीन दाखल झालेली पुस्तके

१. गॉडफादर – मारियो पुझो : अनुवाद-रवींद्र गुर्जर
२. पावनखिड (बाजी प्रभूच्या जीवनावर कादंबरी) रणजित देसाई
३. रचनात्मक कार्याच्या दिशा – संयोजक : विलास चापेकर
४. अभिनेत्री (कादंबरी) : बाबा कदम
५. मधुमेहाची तोडओळख : डॉ. रमेश नी. गोडबोले
६. रूपवेध (समीक्षात्मक लेख) : प्रा नरहर कुरुंदकर
७. जॉन आणि अंजिरी पक्षी (कथासंग्रह) : भारत सासणे
८. शब्दायन (ललित लेख) : सरोजिनी वैद्य
९. सभ्य स्त्री-पुरुष हो! (भाषणसंग्रह) प्र. के. अत्रे
१०. आजकालचे साहित्यिक : गंगाधर गाडगीळ

o At Phoenix thousands of books cry out for decent living. That needs a tidy sum! So do not take it ill, if you are asked to pay your dues in time!

**फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

रंगभूमी

# होती एक शारदा

या वर्षीच्या महाराष्ट्र राज्य नागरी नाट्य-स्पर्धेतील प्रथम पारितोषिकविजेते नाटक 'होती एक शारदा' काही दिवसांपूर्वीच बेस्ट कला व क्रीडा मंडळ या मुंबईच्या संस्थेतर्फे सादर करण्यात आलं. राज्य नाट्यस्पर्धेतील प्रथम क्रमांकांची नाटकं सहसा प्रेक्षकाला निराश करीत नाहीत, हा आजपर्यंतचा अनुभव 'होती एक शारदा'ने पुन्हा एकवार दिला.

नाटकाचे लेखक आहेत चिं. त्र्यं. खानोलकर. त्यांच्याच शब्दांत सांगायचं तर हे पोटार्थी लिहिलेले नाटक नाही अर्थातच त्यामुळे त्याला आलेल्या खानोलकरी बाजीबद्दल अधिक सांगायला नकोच. ही इतकी दर्जेदार नाट्यसंहिता यापूर्वी कुणा संस्थेतर्फे रंगभूमीवर आल्याचं माझ्या तरी आठवणीत नाही. इतके दिवस हे सुंदर नाट्यबीज दुर्लक्षित रहावं, हे एक आश्चर्यच आहे.

ही कथा घडते सुमारे पन्नास–साठ वर्षांपूर्वी; जेव्हा संस्थानिक अस्तित्वात होते, जेव्हा नाटकांमध्ये स्त्रियांची भूमिका पुरुषच करीत होते, जेव्हा नाटकाकडे कंपनीचा धंदा म्हणून न पाहता सबंध कंपनी हेच कुटुंब मानणारे मालक जिवंत होते! गुंडोपंत गोखले (बकुलेश भोसले) अशाच मालकांपैकी एक म्हातारं हाड. त्याच्या कंपनीत हरी जोग (पार्श्वनाथ भोसले) नावाचा पुरुषपार्टी स्त्रीभूमिका अत्यंत चोख वठवी. कंपनीचा 'शारदा' नाटकाचा प्रयोग हातखंडा म्हणून प्रसिद्ध होता. त्याच नाटकाचा प्रयोग करण्यासाठी एका संस्थानिकाने गोखल्यांच्या कंपनीला आमंत्रण दिलं, पण त्याची एक अट होती, शारदेचं काम करणारी व्यक्ती खरीखुरी स्त्री हवी आणि ती देवलांनी केलेल्या वर्णनाबरहुकूम असायला हवी! 'राजाघरचं आमंत्रण म्हणजे आपला केवढा सन्मान!' या भावनेने गुंडोपंतांनी ते आमंत्रण स्वीकारलं आणि सुनेत्रा (वर्षा मंत्री) नावाची एक नायकिणीची मुलगी शारदेच्या भूमिकेसाठी शोधून काढली. तिच्या गळ्यातील हिरकणीला पैलू पाडण्याचे काम कंपनीतील बुवाकडे (अशोक कुलकर्णी) सोपवलं. असा सर्व जामानिमा तयार करून गुंडोपंतांनी संस्थानात पाऊल टाकलं आणि त्याच वेळी एका वेगळ्याच संघर्षाला सुरुवात झाली.

त्या ठिकाणी गेल्यानंतर गुंडोपंतांच्या लक्षात आलं की, राजेसाहेबांना मुलगी हवी होती ती रंगभूमीवरची देवलांची 'शारदा' म्हणून नाही; तर त्यांच्या जनानखान्यातील भोगदासी म्हणून, संस्थानातील इंग्रज अधिकाऱ्याच्या वासनेची भूक भागवणार मिष्टान्न म्हणून! कंपनीतील प्रत्येकालाच आपला मुलगा वा मुलगी मानणाऱ्या गुंडोपंतापुढे हे धर्मसंकट उभं होतं; तर सुनेत्रा आणखी एका पेचप्रसंगाला तोंड देत होती.

एका नायकिणीच्या पोरीने नाटकात का होईना, पण ब्राह्मण मुलीची भूमिका केल्याने धर्म भ्रष्ट होतो, असा नाटक कंपनीतील झाडून सगळ्या नटांनी गिल्ला सुरू केला. स्वतःची शारदेची भूमिका या कानामागून येऊन तिखट झालेल्या नेत्राने मिळवावी, तीही नाटकाचा प्रयोग राजेसाहेबासमोर करायचा असताना, या गोष्टीने भडकलेल्या हरी जोगाने सुनेत्राविरोधी पुढाकार घेतला होता.

या दोन्ही सूत्रांमधून खानोलकरांनी संस्थानाचा 'बडा घर, पोकळ वासा' प्रकार, आपल्या पाशवी वासनेची पूर्ती करण्यासाठी केलेला सत्तेचा निलाजरा वापर आणि खुळचट धार्मिक कल्पनांची ढाल पुढे करून सुनेत्राच्या आईच्या नायकीणपणाचा आधार घेऊन अन्य नाटकवाल्यांनी सुनेत्राचा–व्यक्ती म्हणून आणि कलाकार म्हणूनही-चालवलेला अपमान या गोष्टींवर मर्मभेदी टीका केली आहे. त्याचबरोबर अनेक बाजू, कैक कंगोरे असलेली व्यक्तिचित्रंही उभी केली आहेत.

पुढे राजेसाहेबांकडून शारदेला नेण्यासाठी आलेल्या मेण्यात सुनेत्राच्याऐवजी हरी जोगच बसून गेला; पण प्रत्यक्षात राजवाड्यावर त्याच्या वाट्याला आली विटंबना! उदास मन:स्थितीत परतलेल्या हरीनं दुसऱ्यादा मात्र सुनेत्राला मेण्यातून पाठवलं. मेण्यातून गेल्यानंतर आपल्यावर बलात्कार करू पाहणाऱ्या गोऱ्या साहेबाच्या तावडीतून स्वतःचं शील वाचवण्यासाठी सुनेत्रानं तळ्यात उडी टाकून आत्महत्या केली; तर हरीनेही महेशशास्त्री (यशवंत दाणी) या कोडग्याचं काम करणाऱ्या नटाच्या हातून 'देवल मास्तराची शारदा' भ्रष्ट होऊ नये म्हणून विहिरीत उडी टाकून जीव दिला. (आधी हरी व महेशचे संबंध असल्याचे उल्लेख नाटकात आहेत)

या नाटकाचे दिग्दर्शक होते रमाकांत केदार. शिवाय श्रेयनामावलीत मार्गदर्शक म्हणून रमेश रणदिवे हे नाव होते. रमेश रणदिव्यांच्या 'वस्त्रहरणा'ने सध्या चांगलाच धुमाकूळ घातला आहे. 'होती एक शारदा'च्या नेपथ्य, प्रकाशयोजना या तांत्रिक बाबींवरूनही त्यांचा सराईत हात फिरल्याचं नाटकात जाणवतं.

कलाकारामध्ये हरी जोगची भूमिका केलेले पार्श्वनाथ भोसले, गुंडोपंत गोखले झालेले बकुलेश गोखले आणि सुनेत्राचे काम करणाऱ्या वर्षा मंत्री यांच्या भूमिका अतिशय सरस वठल्या. महाराजांची भूमिका केलेले अशोक सावंत वगळता अन्य कलाकार 'ठीक' सदरात मोडणारे होते. अशोक सावंतांनी मात्र 'हू हू हू हू' असे सतत हुमत आणि इकडून तिकडे उड्या मारत बालनाट्यातला राजा उभा केला.

नाटकाला संगीत अशोक कुलकर्णींनी दिले होते. सुनेत्रा व बुवाचा मिळून चाललेला रियाझ, शारदेची पदं (मूर्तिमंत भीती उभी), 'शारदा'मधील नांदी इत्यादी गोष्टींचा त्यांनी सुंदर वापर केला; पण या पार्श्वभूमीवर नाटकातील त्यांचं स्वतःचं पद मात्र अतिशय रटाळ आणि सामान्य झालं.

या नाटकातील शेवटच्या एका प्रकाशयोजनेबद्दल लिहिल्याशिवाय राहावत नाही. स्टेजच्या डाव्या बाजूला असलेल्या पडद्यावर नांदी म्हणणाऱ्या पात्रांच्या छोट्या–मोठ्या सावल्या पडलेल्या. (नाटकातील नाटक– म्हणजे ही नांदी त्या पडद्याच्यापुढे म्हणजे प्रत्यक्षात विंगेत चालू आहे.) त्याच पडद्यावर पुढून एका स्पॉट-लाइटचा वापर करून त्या सर्व छोट्या सावल्या सामावून टाकील अशी गुंडोपंतांची एक मोठी सावली पाडली जाते. 'रंगाचो दिन दिन दिवाळी' करून आणि दिव्याचा मिचमिचाट करून त्याला प्रकाशयोजना हे दिलेलं नाव पाहिलं की, अशी एखादी अतिशय परिणामकारक व्यवस्था कायम मनावर कोरली जाते.

प्रायोगिक नाटकांना उत्तेजन देण्याच्या उद्देशाने सादर केल्या जाणाऱ्या राज्य-नाट्यस्पर्धेतील या नाटकाने पुन्हा एकदा दर्जेदारपणाच्या बाबतीत व्यावसायिक रंगभूमीवरील कित्येक उथळ, बाजारू नाटकांच्या खणखणीत थोबाडीत लगावली आहे.

—सदानंद बोरसे

## चित्रपट

# नागीण

## कॅमेरामन देवधरांना शुभेच्छा

समजा, तुम्ही एक अफलातून जुळारी किंवा 'संकलनकार' आहात आणि तुम्हाला जर सांगितलं की, 'गंगा-जमना' व तत्सम दरोडेखोरपटातील स्वाभिमान डिवचलेल्याची सूडाच्या भावनेने पेटलेली दृश्यं घ्या; 'मदर इंडिया' सारख्या चित्रपटातली परिस्थितीच्या रेट्यातही उभी राहणाऱ्या स्त्रीची आणि जन्माला येणाऱ्या मुलामध्ये सूडाचा अंकूर पोसणाऱ्या आईची दृश्यं घ्या; 'नया दौर' पासून ते अलीकडच्या 'दोस्ताना'-पर्यंतच्या अनेक हिंदी चित्रपटांप्रमाणे परस्परांवर बेफाम प्रेम करणाऱ्या दोस्तीची आणि गैरसमजुतींमधून त्यांच्या अचाट 'दोस्ती'ला लागलेल्या सुरुंगाची व त्यातून निर्माण झालेल्या वैमनस्याची, 'दुष्मनी'ची दृश्यं घ्या; शिवाय, इनामदार–पाटलाच्या बेछूट माजाची दृश्यं घ्या! या सर्व दृश्यांना थोडी प्रादेशिकतेची फोडणी द्या; एखादी लावणी, दोन-चार गाणी, थोडासा विनोद आणि काहीसे गंभीर प्रसंग टाका; बस यातून जी जुळवाजुळव तयार होईल त्या चित्रपटाला 'नागीण' हे नाव द्या!!

'चित्रवेध' या नव्या संस्थेतर्फे रमाकांत कवठेकर व विवेक-वसंत या दिग्दर्शकद्वयानी अशाच प्रकारची जुळवाजुळव करून 'नागीण' हा चित्रपट सादर केलाय! या चित्रपटाची कथा-पटकथा-संवाद लिहिणाऱ्या रणजित देसाईंनी खाल्ल्या अन्नाला जागणाऱ्या शपथांच्या भोवऱ्यात अडकलेल्या बेरड जमातीचा आधार देऊन उपरोल्लेखित कथेला हा असा साज चढवला आहे.

हळुवार फुलवलं तर डोलेल, पण डिवचली गेली तर फूत्कारेल अशी नागी(ण) ही तेग्या बेरडाची बायको. तेग्या–चंद्रोजी यांची 'दोस्ती', तर तेग्याचा मालक इनामदार व चंद्रोजीचा मालक सारोळीचा पाटील यांची दुष्मनी! तेग्याकडून एक दिवस चूक होते आणि इनामदार तेग्याला शपथेत अडकवतात-सारोळीच्या पाटलाचा 'खून' करण्याच्या! –खून होतो–तेग्या–चंद्रोजींच्या दोस्तीचं दुष्मनीत रूपांतर – तेग्याला सजा वगैरे होते. वचन विसरून इनामदार पोटुशी नागीला लाथडतो. नागी इनामदाराच्या सूडाची भावना मुलाच्या मनात तेवत ठेवते आणि मग पुढं शपथेच्या भोवऱ्यात कथा गुरफटत जाते.

पटकथेच्या दृष्टीने 'नागीण' च्या कथेत काय वेगळं? काही नाही! पक्के व्यावसायिक हिशेब ठेवून कथेतील घटना बेतल्याचं स्पष्टपणं दिसतं आणि संबंधित मंडळीही त्याची कबुली देतात. तरी पण ही मंडळी बेरड जमातीचा हवाला देऊन हे सर्व करतात तेव्हा अनेक प्रकारच्या अपेक्षांचा भंग होतो. पाटलाच्या वाड्याचा कडी–कोयंडा काढून जेव्हा मराठी चित्रपट 'ठाकुरवाडी'त जातो, कोकणात जातो किंवा बेरडांकडे जातो तेव्हा साहजिकच वाटतं की- हे दिग्दर्शक आजचा संदर्भ देऊन बेरडांच्या जीवनाचा धागा सादर करतील; त्या जमातीतल्या मानसिक, सामाजिक व सार्वजनिक ताणतणावांचं दर्शन घडवतील; पण ती दृष्टीच इथं दिसत नाही. बेरडांचं निमित्त करून पुन्हा ही कथा पायात लुडबुडणाऱ्या कुत्र्याप्रमाणे 'पाटला'चं धोतर ओढत फरफटतच जाते. त्यामुळं पटकथेच्या संदर्भात 'नागीण' हा काही कौतुक करण्याच्या लायकीचा चित्रपट खचितच नाही.

हिशेबी पटकथा लिहिणाऱ्या रणजित देसाईंची एक महत्त्वाची चूक म्हणजे, चित्रपटात घटना इतक्या वेगाने घडतात (कादंबरीची पानं भराभर चाळल्यासारख्या) की, कोणत्याही एका घटनेला इतर घटनांच्या संदर्भातसुद्धा एक स्वतंत्र, स्वयंभू अस्तित्व राहात नाही. पुढच्या घटनेत विलीन होताना मागील घटनेला अर्थ उरत नाही, तर संदर्भहीन रचनेमुळं पुढची घटनाही नजीकच्या काळात निरर्थक बनते. त्यामुळं विविध घटनांची स्वतंत्र परिणामकारकता तर मारलीच जाते, शिवाय सर्व घटनांची मिळून होणारी सामूहिक परिणामकारकताही नष्ट होते. ज्या सूडाच्या भावनेपोटी हे सर्व काही 'नाट्य' उभं राहतं आणि ज्यावर सबंध चित्रपट बेतलेला आहे ती घटना म्हणजे पोटुशी नागीला इनामदार लाथाडण्याचं दृश्य! फक्त अर्ध्या मिनिटातच हे दृश्य उरकलं जातं. त्यामुळं पुढं नागीचा सूडाचा प्रवास केवळ दिग्दर्शकाच्या अट्टाहासापायी ताणला जात आहे, असंच वाटतं.

कुलदैवतांच्या नावानं आणा – भाका करून शपथेचा चित्रपटातील वापर तर शेवटच्या काही दृश्यांत केवळ हास्यास्पद ठरतो. आसपासच्या परिस्थितीचं भान विसरून फक्त 'शपथे'साठीच जिवाची बाजी लावतच बेरड जगत असतात, इतपतच बेरड जमातीविषयी या मंडळींची समज दिसते आणि तोच गैरसमज इथं पोसलाही जातो.

पटकथेच्या संदर्भात 'नागीण' उथळ आहे, मात्र मराठीच्या संदर्भात 'नागीण' हा धंदेवाईक चित्रपट असला तरी 'चित्रपट' म्हणून मान्यता द्यावी इतपत 'नागीण'च्या टीम वर्कनं निश्चितच कष्ट घेतले आहेत. चित्रपटमाध्यमाचा वापर कसा करायचा याबाबत मराठी चित्रपटकारांनी सोयीनुसार अज्ञान दाखवल्याचा आतापर्यंतचा अनुभव आहेच; पण चित्रपट माध्यमाबाबतचं अज्ञानही वेळोवेळी दाखवलं आहे. 'नागीण' नं मात्र या माध्यमाची समज असल्याची चुणूक दाखवली आहे आणि त्याचं श्रेय जातं, अर्थातच चित्रपटाचं छायाचित्रण करणाऱ्या कॅमेरामन एस. डी. देवधर यांना!

अवतार कौलचा '२७ डाउन' व गिरीश

कर्नाड यांचा 'वंदानंदू कालगल्ली' (कन्नडी) या चित्रपटांच्या छायाचित्रणाचा अनुभव पाठीशी घालूनच एस. डी. देवधर यांनी मराठीत एक दमदार पाऊल टाकलं आहे. छायाचित्रण चांगलं होणारच, या खात्रीनेच रंगीत चित्रपटाच्या भाऊगर्दीतही ब्लॅक अॅन्ड व्हाईट चित्रपटाचं धाडस त्यांनी केलं आहे आणि ते यशस्वी झाले आहेत. क्लोज अप, मिड शॉट, लाँग शॉट अशा फक्त तिहेरी हालचालीतच अडकलेल्या मराठी चित्रपटाच्या कॅमेऱ्याला त्यांनी चांगलंच मोकळं सोडलं आहे. ओतूरच्या लोकेशनवर हा मराठी चित्रपटाचा कॅमेरा चक्क सैरावैरा पळतो, धावतो आणि योग्य वेळी त्याला पकडण्याचं भानही देवधर दाखवतात. 'फांदीवरून कावळा बोलतोय' या गाण्याच्या वेळी देवधरांचा कॅमेरा निसर्गात पहुडतो तर गायीच्या उधळण्याच्या दृश्याच्या वेळी तो तितकाच उधळतो. अर्थात इथं संकलनकार जावेद सय्यद हेही कौतुकास पात्र आहेत.

'नागीण'मधील 'इनडोअर' व 'आउटडोअर' दृश्यात देवधरानी 'सोअर्स' लाइटचा सुरेख व सुयोग्य उपयोग केला आहे. नैसर्गिक प्रकाशाचा वापर करण्याचं कसब साधल्यामुळं पटकथादृष्ट्या कमकुवत दृश्यांनाही उठाव आला आहे. एक ताजातवाना टवटवीतपणा मिळाला आहे. बेरडांचा बेडरपणा दाखवण्यासाठी मधूनमधून देवधरांनी दिलेले 'extreem close-ups' बरंच काही सांगून जातात! बक अप देवधर!!

'नागीण'नंतर देवधरांचं छायाचित्रण असलेले 'आश्रीत' व 'अत्याचार' हे चित्रपट येत आहेत तेव्हा या निमित्तानं देवधराना शुभेच्छा!

देवधराचे फार कौतुक केलं तर संबंधितांपैकी कोणी तरी म्हणेल, यांना फक्त 'डोळे'च दिसतात, 'कान' दिसत नाहीत. म्हणून थोडं संगीताविषयी लिहिणं भाग आहे. सुधीर मोघे या कवीनं कथाबरहुकूम शब्दांची जुळवाजुळव काही फेरफार करून केली आहे. 'नाही कशाची ददात' आणि 'हे मर्दाचं काम नव्हं' ही दोन गाणी त्यानी बेरडाच्या जीवनाला 'परिशिष्ट' जोडल्याच्या प्रयत्न केल्यासारखी वाटतात. त्यातूनच कथेच्या ओघात पुन्हा एकदा बेरड–जीवनाचे व यातील व्यक्तीचे विविध पैलू फुलवले जातात. काही गाण्यांत त्यांनी लयबद्धता साधली आहे, शब्दाला शब्द देण्याच्या, यमक जुळविण्याच्या तंत्रात ते यशस्वी ठरलेही आहेत; परंतु संगीतकार भास्कर चंदावरकरांनी या दोन्ही गाण्यांना ढोल वाजवून शब्दावरहुकूम संगीत दिलं आहे. 'फांदीवरून कावळा बोलतोय ग'ची रेकॉर्ड 'आपली आवड' कार्यक्रमात बऱ्याच वेळा घासली जाण्याची शक्यता आहे, तर 'एका चिमणीनं' या लावणीला दिलेल्या उडत्या चालीमुळं ती 'कामगार सभे'ला साजेशी झाली आहे. 'उदे ग अंबे उदे' हे पारंपारिक गीत असल्यामुळं इथं चालीचा प्रश्न नसून वाद्यं वाजवण्याचाच प्रश्न आहे आणि चंदावरकरानी ही वाद्यं साथीदारांकडून वाजवून घेतली आहेत.

अभिनयाच्या बाबतीत इथं बाजी मारली आहे नाना पाटेकरनं. नाना बेरडाच्या भूमिकेत तो 'फिट्ट' बसतो. 'हुमिंग' करण्याची त्याची पद्धत चित्रपटातल्या त्याच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव आणते. सहजतेचं प्रशस्तिपत्रक त्याला मिळतं. भरदार आवाजाची एकच पट्टी कायम लावल्यामुळं तो मधूनमधून काहीसा एकसुरी वाटला तरी त्याची करडी नजर, चेहऱ्यावरील राकट भाव आणि नाच–गाण्याच्या कार्यक्रमातील सहजता यांचं कौतुक करणं आवश्यक आहे. रंजना या नटीकडून अपेक्षा न करतासुद्धा तिनं आपलं बेढब शरीर वगळता काही दृश्यांना न्याय दिला आहे.

रवींद्र मंकणी या नवख्या नटाची निवड जरा चुकीची वाटते ती त्याच्या चेहरेपट्टीमुळं. बेरडाचा मुलगा आणि त्यातूनही तो नागीचा मुलगा वाटत नाही. टायखाली धोतर नेसल्याचाच हा प्रकार वाटतो. त्यामुळ दोष मंकणीचा नाही. अशोक सराफ नेहमीच्या सराईत पाचट भूमिकापेक्षा इथं बऱ्यापैकी अभिनय करतात. निळू फुले मात्र कधी नव्हेत ती निराशा करतात. आ. दे. पाटील मात्र मामाच्या 'चंद्रकांत गोखले' छाप भूमिकेत बरंच काही न बोलता सांगतात.

राघवेंद्र कडकोळ बेरडाला शोभून दिसतात, तर मराठीतील 'मुक्री' फेम नंदू पोळ यांच्या उंचीचा फायदा घेऊन केलेल्या विनोदी प्रसंगानं तात्पुरती खसखस निर्माण होते. अर्थात मराठी चित्रपटातील विनोदाची उंचीही या निमित्तानं स्पष्ट होते. एकंदरीत मान खालीच घालावी लागते.

तेव्हा अगदी 'शपथ' घेऊन सांगायचं झालं तर छायाचित्रणाचं वैशिष्टय वगळता चित्रपट इतर अनेक बाबतीत समाधान देत नाही. मात्र 'चित्रवेध'ची ही पहिलीच निर्मिती असल्यामुळं यापेक्षा काही तरी समाधानकारक निर्मिती पुढील काळात केली जाईल, अशी अपेक्षा लादणं चुकीचं असलं तर तेवढाच आशेचा किरण आहे. बाकी आसपास मराठी चित्रपट अंधारातच वावरतोय.

—कलंदर

---

## सप्रेम नमस्कार...

पृष्ठ २ वरून

अशा परिस्थितीत मला स्वतःचे रक्षण तलवारीनेच करण्यावाचून गत्यंतर नाही. माझा धर्म मला स्वतःचे रक्षण कसे-करावे हे शिकवत असला तर मी तो त्याज्य कसा मानावा?

महाभारतामधील श्लोकाचे भाषांतर देताना डॉक्टरसाहेबानी दाखवलेली हातचलाखी निंद्य आहे. मूळ श्लोकात 'कुशीलको' हे विशेषण सर्वप्रथम आहे. वाईट शील असणाऱ्या आणि देवळात पूजा करणे, ग्रहनक्षत्रांचे फल सांगणे इ. वृत्ती आचरणाऱ्या ब्राह्मणांना हे युधिष्ठिरा, तू जेवताना पंक्तीलासुद्धा घेऊ नकोस–असा या श्लोकाचा अर्थ! डॉ. अभ्यंकरानी स्वतःच्या विधानाच्या पुष्ट्यर्थ श्लोकाचा अर्थ नेमके विशेषण गाळून हवा तसा फिरवून घेतलेला दिसतो. कोणत्याही भाषेतील कोणतेही वचन, श्लोक असा तुटक स्वरूपात देऊन आपणास हवा तो निष्कर्ष वाचकांच्या गळी उतरवणे कोणासही जमू शकते.

उदाहरणार्थ–'प्रायशो रूपभेदेन साहचर्यात् च कुत्रचित्! स्त्री–पुं–नपुंसकं ज्ञेयं तद्विशेषविधेः क्वचित्।' हा अमरकोशातील श्लोक मी वेगळयाच 'हॉट रेफरन्स'ने टाकल्यास किती धमाल उडू शकेल! स्वतःस बुद्धिप्रामाण्यवादी म्हणून गौरवून घेणाऱ्यांनी अगोदर स्वतःला बुद्धी किती आहे याचे मोजमापन करून घेऊनच मग खुशाल तिच्याशी प्रामाणिक रहावे हे उत्तम!

२० मे, १९८१ चंद्रकांत कुलकर्णी, पुणे

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)

# हा सुद्धा आमच्याकडे बचत करतो

कमीत कमी बचत करणारा खातेदार सुद्धा
आमच्या दृष्टीने मोठाच.
महाबँकेतील बचत खाते सर्वांकरिता आहे.
बचतीची सवय अंगी बाणवा.
बचतीवर भरपूर व्याज मिळवा.
महाबँकेची कोणतीही शाखा आपले
स्वागतच करील.



**बँक ऑफ महाराष्ट्र**
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी : "लोकमंगल" शिवाजीनगर
पुणे-४११ ००५

R·A·Advtg·